www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर   निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील   सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 211 वा   बुधवार दि. 16 एप्रिल २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ४   RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## निजामपूर विभागातील भाले येथे भाले गाव ते भाले पाझर तलाव रस्त्याचे डाबरकरणं उदघाट्न. मा. ना. भरत शेठ गोगावले यांच्या हस्ते...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव:-** माणगांव तालुक्यातील भाले गाव ते भाले पाझर तलाव रस्त्याचे "नामदार भरत शेठ गोगावले रोजगार हमीयोजना फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री " यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न आज दि १३रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सहयोग मित्र मंडळ मंचेकर आली व वरची आली यांच्या वतीने भाले गाव ते भाले पाझर तलाव रस्त्याचे डाबरीकरणं उदघाटन मा. श्री. नामदार भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला यावेळी समस्त ग्रामस्थ यांनी सुरुवातीला ढोल ताशाच्या गजरात तसेच पटाक्याच्या आतिश बाजी मध्ये मा ना भरत शेठ गोगावले यांचा स्वागत केले. यावेळी ग्रामस्थांमध्ये नवचैतन्य निर्माण झालेले पाहायला मिळाले भाले गावचे शाखा प्रमुख युवा सैनिक जगदीश खानविलकर, ग्रामपंचायत सरपंच राजाराम खाबे, भागाराम मंचेकर, जयंत खाबे भव्य महाडीक, श्याम चव्हाण तसेच समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.





# ईडीची सहारा समूहावर मोठी कारवाई!

# लोणावळ्यातील ॲम्बी व्हॅलीची ७०७ एकर जागा जप्त

अंमलबजावणी संचालनालयाने सहारा ग्रुपवर मोठी कारवाई करत लोणावळा येथील ॲम्बी व्हॅली सिटीमधील ७०७ एकरची जमीन जप्त केली आहे. या जमिनीची अंदाजे बाजारभाव किंमत सुमारे १४६० कोटी रुपये आहे. ही जप्ती मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२ अंतर्गत करण्यात आली आहे. ही जमीन बेनामी नावांनी खरेदी केल्याचे तपासात उघड झाले आहे. सहारा ग्रुपच्या विविध कंपन्यांकडून घेतलेल्या पैशांनी ही हजारो कोटींची जमीन खरेदी करण्यात आली होती. याची खरी मालकी लपविण्यासाठी बनावट नावांनी नोंदणी करण्यात आली होती, अशी माहिती ईडीच्या एका अधिकाऱ्याने दिली. “सहारा ग्रुपच्या कंपन्यांकडून घेतलेल्या पैशांचा वापर करून बेनामी नावांनी ही जमीन खरेदी करण्यात आली होती,” असेही अधिकाऱ्याने सांगितले.

ओडिशा, बिहार आणि राजस्थान पोलिसांनी नोंदवलेल्या ३ एफआयआरच्या आधारे ईडीने या प्रकरणाची चौकशी सुरू केली होती. मेसर्स हुमारा इंडिया क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड आणि इतरांविरुद्ध आयपीसी, १८६० च्या कलम ४२० आणि १२० ब अंतर्गत याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर, सहारा ग्रुपच्या कंपन्या आणि त्यांच्याशी संबंधित लोकांविरुद्ध ५०० हून अधिक एफआयआर नोंदवण्यात आले. यापैकी ३०० हून अधिक प्रकरणे पीएमएलए अंतर्गत नोंदवण्यात आली आहेत. सहाराने लाखो लोकांना जास्त नफ्याचे आमिष दाखवून पैसे जमा करायला लावले, नंतर त्यांचे पैसे वेळेवर परत केले गेले नाहीत किंवा व्याजही दिले गेले नाही, उलट त्यांना पुन्हा गुंतवणूक करण्यास भाग पाडले गेले असे विविध तक्रारींमध्ये म्हटलं होतं. या कंपन्या मोठ्या नफ्याचे आणि चांगले कमिशन देण्याचे आमिष दाखवून लोकांना आकर्षित करत असत. जमा केलेल्या पैशांचा ठेवीदारांना कोणतीही माहिती न देता गैरवापर करण्यात आला. पैसे परत करण्याऐवजी, लोकांना त्यांची मुदतपूर्ती रक्कम दुसऱ्या योजनेत पुन्हा गुंतवावी लागली. खात्यांमध्ये फेरफार करून जुने पैसे परत मिळत असल्याचे दाखवले जात होते परंतु प्रत्यक्षात ते नवीन योजनेत गुंतवलेले दाखवले जात होते.



## अवैध दारू विक्री बाबत चिखली (व) येथील ग्रामस्थांनी पोलीस स्टेशनला दिले निवेदन

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-**तालुक्यातील चिखली (व) ग्रामपंचायत हद्दीत मागील काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात अवैध दारूची विक्री होत असल्याने वादविवाद,भांडणतंटे वाढले असून महिलावर्गही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाला आहे. अनेक तरुण या व्यसनाकडे वळल्याने अनेकांचे संसार उदध्वस्त तसेच उघड्यावर पडले आहे. यामुळे ग्रामस्थांनी अवैधरित्या दारू विक्री बंद करावी अशी मागणी केली आहे. अवैद्य दारू विक्रेत्यांना आम्ही ग्रामस्थ व महिला बचत गट यांनी अनेकदा दारू विक्री बंद करण्याबाबत सुचना दिल्या परंतु अवैद्य दारू विक्रेते कुणाचेही ऐकण्याच्या मनस्थीतीत नाही ते गावामध्ये गुंडगिरी करून अवैद्य दारू विक्री करीत आहे व आमचे कुणीच काही वाकडं करू शकत नाही अशी भाषा वापरत असतात, आम्ही पोलीसांना हप्ते देतो, आम्ही कुणाच्याही बापाला घाबरत नाही, भित नाही, कुठे जायचे तिथे जा असे म्हणुन जोमाने अवैद्य दारू विक्री करीत आहे चिखली(व) या गावामध्ये आजुबाजुच्या गावातुन लोक दारू पिण्याकरीता येत असतात आणि दारू पिऊन गावात अशांतता पसरवितात त्यामुळे गावात दररोज भांडण तंटे होत असतात. दारू विक्री ही बस स्टॉप परिसरात राजरोसपणे सुरू आहे. तसेच अवैद्य दारू विक्री ही बस स्टॉप परिसरात होत असल्यामुळे गावातील विद्यार्थ्यांवर व लहान मुलांवर याचा विपरीत परिणाम होत आहे. येथील सुरू असलेली अवैद्य दारू विक्री



त्वरीत बंद करावी अन्यथा नाईलाजास्तव आम्हा गावकऱ्यांना व बचत गटातील महिलांना आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागेल.यावेळी लोकेश दिवे(ग्रा.सदस्य),दुर्गश उमाटे,स्वप्नील ठाकरे,मयुर जुमळे,साहील वनकर,पवन वैरागडे,महेश पाटील, क्षितिज घायवटे, आकाश वनकर, गजानन मेश्राम, प्रशिक वैरागडे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते

## शिवसेना वाशीम तालुका प्रमुख पदी(घोटा गावची आन-बान शान) परमहंस मुसळे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**



वाशिम जिल्ह्यातील शिवसेना पक्ष संघटन बांधणी व मजबूत करण्याकरिता माजी खासदार,तथा विधान परिषद आमदार. भावनाताई गवळी यांनी विविध कार्यकर्त्याच्या कार्याची दखल घेऊन नव्याने नियुक्ती केल्या. यावेळी शिवसेना वाशिम तालुकाप्रमुख प्रकाशभाऊ महाले यांची उपजिल्हाप्रमुख पदी नियुक्ती केली. तसेच शिवसेना वाशिम तालुका प्रमुख पदी परमहंस मुसळे, वाशिम शहरप्रमुख पदी विशाल सोमटकर, शिक्षक सेना उपजिल्हाप्रमुख पदी देवानंद बांगर, युवा सेना वाशिम तालुकाप्रमुख पदी मोहन कोल्हे, शिवसेना अनुसूचित जाती सेलच्या वाशिम शहर प्रमुख पदी आकाश कांबळे यांच्यासह आदींची निवड करण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विजयभाऊ खानझोडे , जिल्हा संघटक अनिल गरकळ, शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख प्रशांत कव्हर, नागेश घोपे, चौधरी सर, ज्येष्ठ शिवसैनिक अमृतराव गोरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## राळेगाव आगारातील नविन लालपरीचा लोकार्पण सोहळा ना.प्रा.डॉ.अशोक उईके यांचे हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राळेगाव (वार्ता.)**

आज दि.१३ रोजी राळेगाव आगारात नव्याने दाखल झालेल्या लालपरी बसेस चा लोकार्पण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन राळेगाव बसस्थानक येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन ना.प्रा. डॉ. अशोक उईके आदिवासी विकास मंत्री महाराष्ट्र राज्य, अध्यक्षस्थानी अमित भोईटे तालुका दंडाधिकारी राळेगाव, प्रमुख पाहुणे चव्हाण यंत्र अभियंता यवतमाळ, पांडे विभा. भांडार अधिकारी यवतमाळ, चित्तरंजन दादा कोल्हे भाजपा तालुका अध्यक्ष मा.जि.प.स.उषाताई भोयर, पंचायत समिती सभापती प्रशांत तायडे, मामा चांदे, भुपेद्र कारीया, वंदनाताई कुटे भाजपा महीला तालुकाध्यक्ष डॉ. कुणाल भोयर,आगार व्यवस्थापक बोकडे, इंगोलेताई, छायाताई पिंपरे, अशोक वर्मा, डॉ. कोकरे, सुधाकर गेडाम, शशिकांत धुमाळ, गणेश देशमुख, शुभम मुके, आशिष इंगोले, विनोद मांडवकर, प्रफुल्ल कोल्हे, गोपाल मशरू, डॉ. अशोकराव थोडगे, सह इतर मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक बोकडे आगार व्यवस्थापक यांनी केले. सूत्रसंचालन सतिश डाखोरे यांनी केले तर आभार संदीप पेंदोर यांनी मानले. तर गजानन पोले, प्रफुल्ल मेश्राम, महेश गलांडे, विनोद मडावी, रामुजी आडे, पल्लवी वाकडे, नावेद सिद्दीकी, कुमरेताई, सैय्यद फिरोज, महंमद फिरोज, मांडवे, सदानंद टेकाम, गजानन पंधरे सह इतर सर्व कर्मचारी बांधवानी कार्यक्रम करण्यास परीश्रम घेतले.



# नगराजशेठ सीबीएसई स्कूल उरण येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

### डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारंची बांधिलकी जपणे ही काळाची गरज :नरसू पाटील

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

उरण मधील साई संस्थेच्या नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात अली.यावेळी उपस्थित साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पणकरून या जयंतीचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी साई संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ.पद्मिनी पाटील,स्कूलचे प्रशासक प्रदीप पाटील,




प्रिन्सिपॉल सौ.ज्योती म्हात्रे,शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास उपस्थित असणारे संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील सरांनी आपले मार्गदर्शनपरविचार मांडताना बाबासाहेबांच्या केलेल्या कार्याच्या आठवणीना उजाळा देत त्यांनी संघर्षातून निर्माण केलेल्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की “बाबासेबांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील आंबावाडे गावात झाला एका ब्राम्हण शिक्षकाने आंबावाडेकर हे त्यांचे नाव बदलून “आंबेडकर” हे नाव त्यांना देऊन त्यांच्या जीवनाची दिशाच बदलून टाकली,अस्पृश्य म्हणून कटू अनुभव मिळाल्याने सामान्य जनतेच्या व अस्पृश्य समाज्याच्या न्याय हक्कासाठी त्यांनी अनेक सत्याग्रह केले त्यात रायगड जिल्ह्यांतील महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिक येथील काळ्यारामाचे मंदिर सत्याग्र हकरून अस्पृशांते खुले करून दिले नेहमी सांगत आले आहेत की “शिकवा- चेतवा-संघटीत व्हा शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे जो प्याला तो गुरगुरल्या शिवाय राहात नाही” असा मंत्र समाज्याला देत त्यांनी आपल्या कारकिर्दीत शिक्षणाची मोठी फळीच तयार केली आजही त्यांनी स्थापन केलेली अनेक विद्यालय-महाविद्यालय देशांत कार्यरत आहेत.स्वतंत्र भरताचे विधीमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले आहे. **पान २ वर**

# ग्रुप ग्रामपंचायत मांदाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी..

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी : नितीन लोखंडे**

**तळा :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मांदाड येथे महामानव बोधिसत्व, संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामपंचायत मांदाडच्या सरपंच सौ. लता करंजे आणि उपसरपंच श्री. अनंत लोखंडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ग्रामविकास अधिकारी माडेकर सर यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर पुष्प अर्पण करून अभिवादन केले. नंतर ग्रामपंचायतीमार्फत सरपंच, उपसरपंच ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून उपस्थित सर्व मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. बहुजनांचे उद्धारक, उच्चशिक्षित विद्याविभूषण ज्ञान सागर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक भारतीयांना स्वतंत्र समता न्यायाचे अधिकार देऊन बंधुभावाची शिकवण दिली. प्रत्येक भारतीय नागरिकांना समाजामध्ये स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार दिला. नागरिकांच्या जीवनातील विषमतेचा अंधकार दूर करून समानतेचा प्रकाश निर्माण केला.



अशा महामानवाच्या जयंती दिनानिमित्त अनेक वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. मांदाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. ससाने यांनी उपस्थितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचे महत्त्व पटवून देत संविधानामुळे भारत कसा महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे या विषयीचे महत्व विशद केले. तर नितीन लोखंडे यांनी आपल्या भाषणातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना दिलेल्या अधिकारांची जाणीव करून देत उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. मांदाड कुणबी समाजाचे अध्यक्ष दिनेश पिठे यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा गौरव करून अभिवादन केले. तर उत्तम लोखंडे यांनी संविधानामुळे स्त्रियांना मिळालेल्या समानतेच्या हक्कामुळे आज महिला पुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रांमध्ये कशा उच्च पदावर काम करत आहेत या विषयाचे महत्त्व सांगून ग्रुप ग्रामपंचायत मांदाडला छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा भेट दिल्या. मांदाड येथील सावित्रीच्या लेकी कुमारी भूमिका दत्तात्रेय दांडेकर आणि कुमारी श्रुतिका गोपाल पिठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी तसेच त्यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. ग्रुप ग्रामपंचायत मांदाड तर्फे भूमिका दत्तात्रय दांडेकर आणि श्रुतिका गोपाल पीठे यांना संविधानाचे पुस्तक बक्षीस देऊन गौरवण्यात आले. तर कुमारी स्वरा नितीन लोखंडे यांनी जयंतीच्या निमित्ताने नृत्य सादर करत कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमासाठी कुडे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर, गावचे पोलीस पाटील संदेश चव्हाण, कुडे महिला बचत गट अध्यक्षा सौ.डायना नितीन लोखंडे, तसेच कुंदाताई माळी, अनुष्का लोखंडे, स्वाती तिवरेकर, चंद्राबाई लोखंडे, गंगाबाई लोखंडे, मांदाड ग्रामपंचायत सदस्य वसीम बानकोटकर, गितिषा दांडेकर, ग्रामपंचायत कर्मचारी विजय शिलकर, ग्रामपंचायत शिपाई माधवी पिठे, राष्ट्रवादीचे जेष्ठ कार्यकर्ते मालुसरे, हाफिज भाई, दिनेश पीठे, भावेश करंजे जनार्दन दांडेकर, प्रकाश लोखंडे, नथुराम लोखंडे, किरण मोरे, पांडुरंग लोखंडे, तसेच मांदाड ग्रामपंचायत हद्दीतील ज्येष्ठ श्रेष्ठ नागरिक महिला अंगणवाडी कर्मचारी, नागरीक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रुप ग्रामपंचायत मांदाडचे उपसरपंच श्री. अनंत लोखंडे यांनी केले तर ग्रामविकास अधिकारी माडेकर सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून उपस्थितांचे आभार मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच न्याय, समता आणि बंधुतेचा अनोखा संगम! - संपत गारगोटे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड, पुणे**

**चाकण :** शिवभिम सयुक्त जयंती महोत्सव एकतानगर चाकण आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा निमित्ताने प्रसिद्ध व्याख्याते व इतिहास अभ्यासक संपत गारगोटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या विचारांनी लाखो लोकांचे जीवन उजळवले, अन्यायाविरुद्ध लढण्याचं बळ दिलं. दरवर्षी १४ एप्रिल रोजी साजरी होणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे फक्त एक स्मरण दिन नव्हे, तर हा दिवस आहे प्रेरणेचा, परिवर्तनाचा आणि आत्मपरीक्षणाचा. भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांनी केवळ कायदे बनवले नाहीत, तर प्रत्येक वंचित घटकाला आपलं हक्काचं स्थान दिलं. आणि म्हणून जयंतीला केवळ नाचण्यापेक्षा बाबासाहेबांच्या विचाराने अनुकरण करणे गरजेचे आहे असे आव्हान गारगोटे यांनी यावेळी केले.

बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, समतेचा अधिकार, आणि सामाजिक न्याय यासाठी त्यांचा संघर्ष आजही नव्या पिढीला मार्गदर्शक ठरतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या विचारांना प्रणाम करून, त्यांचं स्वप्न साकार करण्याची नवी शपत संपत गारगोटे यांनी उपस्थिताना दिली. यावेळी या कार्यक्रमाचे आयोजन शिवभीम संयुक्त जयंती महोत्सव एकतानगर चाकण यांनी केले होते यात खेड तालुक्याचे वंचित बहुजन आघाडीचे कार्याध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे,लखन वक्ते,मेहुल पाटोळे,रविंद्र



जांभुळकर,गंगाधर नरवडे,बाळु जवजांळ ,देवानंद आगरे,दिपक गायकवाड,सचिन गोपनारायण, रमेश बचुटे, दीपक आहिरे, दुर्गेश शिरसाट, प्रतीक ब्राह्मणे, संस्कार आंग्रे, नितीन बचुटे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला होता. या कार्यक्रमाचा सूत्रसंचालन वंचित बहुजन आघाडीचे खेड तालुक्याचे कार्याध्यक्ष दत्ताभाऊ कांबळे यांनी केले तर या कार्यक्रमासाठी मारुती साबळे वंचित बहुजन आघाडीचे दिनेश गोतारणे, बुद्ध विहार समितीचे कार्याध्यक्ष भिमराव शिंदे, चाकणचे शिवसेनेचे नेते चेतनभाऊ सोनवणे सामाजिक कार्यकर्ते मोहन कोळी, सम्राट ग्रुपचे विकीभाऊ खंडागळे तसेच तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## वावंजे येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) व रमाबाई महिला मंडळ वावंजे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती पनवेल तालुका अध्यक्ष व रिपब्लिकन पार्टी (आठवले)गट विजय पवार व बंधू अजय पवार यांच्या माध्यमातून सकाळी ९ वाजता तथागत भगवान बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकरच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि सायंकाळी ६:०० वाजता शालेय विद्यार्थ्यांना बॅग वह्या पेन कंपास व इतर वस्तूंचे वाटप सायंकाळी ७ वाजता भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम गाथा माझ्या बुद्ध भीमाची या भीम गीताचा कार्यक्रमाचा नागरिकांनी मनसोक्त आनंद लुटला व "डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो"गौतम बुद्धांचा विजय"असो आशा घोषणा दिल्या यावेळी उपस्थित मान्यवर सुरेश बारशिंगे राष्ट्रीय सरचिटणीस आर पी आय प्रशांत ठाकूर आमदार अविनाश कोळी भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष नितीन पाटील नगरसेवक कामोठे जितूभाई रावलानी पॅराडाईस ग्रुप परेश पाटील उपजिल्हाप्रमुख सेना उ.बा.टा गट रामदास पाटील मनसे पनवेल तालुका अध्यक्ष डी.वी. म्हात्रे वावंजे सरपंच कैलास म्हात्रे ओवे ग्राम पंचायत सदस्य संतोष म्हात्रे नितलस प्रकाश खैरे ग्रामपंचायत सदस्य व प्रभारी मान्यवर मोहनीश गायकवाड मोहन गायकवाड प्रवक्ते रायगड जिल्हा

प्रभू जाधव कार्याध्यक्ष रायगड जिल्हा शहाबाज पटेल राष्ट्रवादी युवा जिल्हाध्यक्ष निखिल सोनवणे उद्योजक व वावंजे गावचे आरपीआयचे पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारंची बांधिलकी जपणे ही काळाची गरज :नरसू पाटील

**पान १ वरुन** या काळात त्यंनी संविधान मसुदाही तयार केला त्यांचा उमेदीच्या कळात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली.जनजागृती साठी त्यांनी वृत्तपत्रही काढली आणि 6 डिसेंबर1956 मध्ये क्रांतीसुर्य , भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्त झाला.त्याच्या विचारंची बांधिलकी ही काळाची गरज आहे.ती घेऊन आपण साई संस्थेच्या विविध विद्यालयातून आणि महाविद्यालयांतून नवीन पिढी घडविणार आहोत असे ते शेवटी म्हणाले.

यावेळी झालेल्या औपचारिक बैठकीत सुरुवातीला स्कूलचे प्रशासक प्रदीप पाटील यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील,कोषाध्यक्षा सौ.पद्मिनी पाटील उपस्थित शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे स्वागत करून ते म्हणाले की "थोर पुरुषांच्या जयंत्या या केवळ साजऱ्या करण्या साठी नसतात तर त्यापासून आपण शिकवण घेण्या साठी त्यांचे स्मरण करणे आवश्यक आहे.डॉ.बाबासाहेब यांनी जीवनात अनेक संघर्ष केले आणि देशाला संविधान सारखा महानग्रंथ दिला जो आजही आपल्या देशाच्या स्वतंत्र्यानतर लोकशाहीतंत्राचा महान आधारस्तंभ जगभरात ओळखला जात आहे"असे ते शेवटी म्हणाले. यानंतर उपस्थित शिक्षकांनी.यानंतर उपस्थित शिक्षकांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित आपापले विचार मांडले.व या महा मानवाला मानवंदना केली.

## पनवेल महानगरपालिका व सिडकोच्या समस्यांचा चेंडू पवार साहेबांच्या कोर्टात .

### लवकरच मार्ग काढू - श्री .शरदचंद्र पवार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

देशाचे नेते आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांची यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पनवेल विभागामध्ये असणाऱ्या समस्या विषयी पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक कोंग्रेसच्या शिष्टमंडळाने भेट घेतली .पनवेल महानगरपालिका विभागात असणाऱ्या प्रत्येक शहरात पाण्याची खुप टंचाई भासत आहे ,अक्षरशा 10 ते 12 दिवस सिडको चे पाणी येत नाही .त्यामुळे येथील नागरिकांचे पाण्याअभावी हाल होत आहेत .यासंदर्भात आज युवक जिल्हा अध्यक्ष शहबाज पटेल , जिल्हा उपाध्यक्ष चाँद शेख ,श्रेयश भावसार ,हर्षल पाटील व ग्राहक मंच सेलचे अध्यक्ष कृष्णा मर्ढेकर व पनवेल युवकचे कार्यकर्ते या सर्वानी साहेबांना समोर हा प्रश्न मांडला .साहेबांनी या प्रश्नाचे गांभीर्य बघता पवार साहेबांनी त्वरित पनवेल महानगपालिका आयुक्त श्री .मंगेशजी चितळे साहेब यांच्याशी चर्चा केली त्यांच्याकडून माहिती घेतली व ज्या शक्य असतील त्या उपाययोजना करण्यासाठी निर्देश दिले .त्यानंतर हे शिष्टमंडळ पनवेल आयुक्तच्या भेटीला पनवेल महानगरपालिका मधे गेले .आयुक्त मंगेशजी चितळे साहेब यांच्याशी चर्चा केली .आयुक्त साहेबांनी



सिड़कोचे अधिकारी यांच्याशी चर्चा करुण लवकरच सिडको मध्ये बैठक लावण्याचे निर्देश पाणी पुरवठा अधिकारी यांना दिले .शिवाय जिल्हा उपाध्यक्ष चाँद शेख यांनी तळोजा सेक्टर 10 मधील उद्यानाचा पुनर्विकास व तळोजा मधील रस्त्यांचे असणाऱ्या प्रश्नांचे निवेदन दिले .आयुक्त साहेबांनी त्वरित सेक्टर 10 मधील गार्डनचा विकास करण्यासाठी सुचना दिल्या .रस्ते ही चांगले करण्यात येतील असे आश्वाशन दिले .जिल्हा युवक अध्यक्ष शहबाज पटेल यांनी पवार साहेव व आयुक्त चितळे साहेब यांचीशी केलेल्या चर्चेसाठी दोनी बाजूने सकारत्मक प्रतिसाद मिळाला आहे . पवार साहेबांची भेट म्हणजे आमच्या सारख्या तरुणांना वेगळी ऊर्जा मिळते – शहबाज पटेल .

## चिखलवर्धा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

**घाटंजी:-** तालुक्यातील चिखलवर्धा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ज्ञानसंपन्नतेच्या शक्तीमुळे व्यक्ती, समाज, राज्य आणि राष्ट्र महान बनत असते. अशी आदर्श विचारधारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती, असे मनोगत तलाठी जगमित्र तुमरे यांनी व्यक्त केले. भारताच्या पावन भूमीवर देशासाठी तसेच समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासणाऱ्या थोर महापुरुषांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. ही बाब आपल्या भारतीयांसाठी अभिमानाची आहे, असे मनोगत चिखलवर्धा येथील पोलीस पाटील गणेश कुमरे यांनी व्यक्त केले. विजय कनाके, प्रीतम बहादे, आबरार पटेल, महेश कनाके, दिनेश नडपेलवार यांनी देखील डॉ. आंबेडकर यांच्या जीवनपटावर प्रकाशझोत टाकत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास उपसरपंच आकाश नडपेलवार, रमेश बहादे, रतन वाघमारे, पुरुषोत्तम लोखंडे, हरिदास पोहळकर, रुपेश धुर्वे, पशुधन पर्यवेक्षक निकेश भोसले, जुबेर खान, वसीम पठाण, असिफ खान , कमलेश कांबळे, प्रदीप पाटील, अमोल लोखंडे, अविनाश नारायणे, उमेश कांबळे, राहुल कांबळे, सुरज नारायणे, महेश पेंदोर, अजय लोखंडे, आदींसह प्रभागातील नागरिक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायफळ येथील जि. प. मराठी शाळेचे शिक्षक महेश कनाके यांनी सूत्रसंचालन केले.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम; बुद्ध वंदना, लाडू वाटप व सह्यांची मोहीम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

प्रज्ञा प्रतिष्ठान व प्रणाली सेवाभावी महिला असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये बुद्ध वंदना, लाडू वाटप, तसेच 'बौद्धगया महाविहार कायदा १९४९ रद्द करावा' या मागणीसाठी सह्यांची भव्य मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार डॉ. ज्योतीताई गायकवाड, धारावी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक राजू बिडकर, माजी आमदार बाबुराव माने, धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक राजू कोरडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे धारावी तालुका अध्यक्ष उल्लेश गजाकोश, मनसेचे संदीप कदम व संदीप कवडे, जिगर मोरे, शिवसेनेचे विठ्ठल पवार, किरण काळे, आनंद भोसले, धगधगती मुंबई चे संपादक भीमराव धुळप, तसेच संस्थेचे अध्यक्ष आयू. अनिल शिवराम कासारे, सरचिटणीस नितीन दिवेकर, कार्याध्यक्ष गौतमी जाधव, संजीवन जयस्वाल व विनीत कासारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांचे विचार जनमानसात पोहोचवण्याचा संकल्प केला व बौद्ध समाजाच्या न्यायहक्कासाठी एकत्रितपणे लढण्याचे आवाहन करण्यात आले.



## पनवेल महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव, भव्य मिरवणूक व विविध कार्यक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने लोकसहभागातून ढोल-ताशा, लेझीम, चित्ररथांसह भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करून डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी साडेसात वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, सहाय्यक संचालक (नगररचना) केशव शिंदे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव





विधाते, प्रसेनजित कारलेकर, श्रीमती मंगल माळवे,मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर लेझीम, ढोल-बॅण्ड पथकाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित तीन चित्ररथ तयार करण्यात आले होते. मिरवणुकीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाजवळ करण्यात आला. त्यानंतर पुढील कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात आयोजित करण्यात आला.

**आमदार प्रशांत ठाकूर**

या प्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेली लोकशाही आणि राज्यघटना जपण्यास महापालिका सज्ज आहे, याचा सर्वांना अभिमान आहे." असे सांगून त्यांनी पनवेल महापालिका व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने आयोजित केलेल्या मिरवणुकीचे व विविध स्पर्धांचे विशेष कौतुक केले. यावेळी विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी उपमहापौर सीताराम पाटील, भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक,आदी मान्यवर तसेच शहर अभियंता संजय कटेकर, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी, शिक्षक, विविध संस्थांचे सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होतेआहे. या मिरवणुकीचा समारोप माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी केला.

## तथागत मित्रमंडळ आणि युवा संवर्धन समितीने मोठ्या जल्लोषात केली

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**प्रतिनिधी/भरत जोगदंडे**

स्थानिक चैतन्य नगर आणि संभाजी नगर येथील तथागत मित्रमंडळ आणि युवा संवर्धन समितीच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी चैतन्य नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. या प्रसंगी चिखली मतदार संघाच्या लाडक्या आमदार विकास कन्या मा. श्वेताताई महाले यांनी उपस्थित बहुजन समुदायास मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयु. प्रा. बी.ए. खरात सर, प्रमुख वक्ते म्हणून आयु. मा. प्रताप भांबळे सर, तसेच प्रमुख पाहुणे मा. पंडितराव देशमुख, मा. संतोष काळे, मा. गोविंद देव्हडे, यांची उपस्थीती प्रामुख्याने होती. कार्यक्रमाच्या प्रसंगी मा. मतदार संघाच्या आमदार श्वेताताई महाले यांनी आपल्या संभाषनामध्ये युवा संवर्धन समितीने केलेल्या कार्याचा गुणगौरव केला त्यामध्ये प्रामुख्याने समितीने आरोग्य शिबीरे, सर्व जातीधर्माच्या खेळाडुंना सोबत घेऊन नागसेन प्रिमीयर लिग क्रिकेटचे सामने, सब खेलो - साथ खेलो या संकल्पनेसह यशश्वीरित्या पार पाडले त्याबददल कौतुक केले. अपंग शाळेतील विद्यार्थ्यांना भेटु देवून त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, रुग्णांना फळ वाटप, या व अशा अनेक समाजउपयोगी कार्याचा त्यांनी गुणगौरव या प्रसंगी केला. कार्यक्रमामध्ये लहान मुलांनी भिमगीतांवर नृत्य व तथा भाषणे देवून कार्यक्रमास रंगत आणली, कार्यक्रमाच्या यशस्वतीतेसाठी तथागत समिती



मधील अध्यक्ष निलेश राम जाधव सचिव सचिन बळीराम जाधव, स्वप्नील साळवे, अमोल आराख, कोषाध्यक्ष - निनाद आराख, राहुल वाघमारे, निलेश जाधव, तलाठी, सागर जाधव, ग्रामसेवक, विकास चव्हाण, विश्वनाथ जाधव, आदित्य जाधव, रोहन जाधव, रुपेश जाधव, रोहित भिसे, नितीन थोरात, सुनिल थोरात, अनिल थोरात, रोहित खरात, सचिन गवई, अभय गवई, हर्षवर्धन थोरात, सागर कंकाळ, गोलु जाधव, मंगेश जाधव, गोपाल कुटे, प्रफुल्ल गवई, राजेंद्र वानखेडे, विकी कंकाळ, आशिष जाधव, अक्षय खरात, मनोज चव्हाण, चेतन खरात, शैलेश चव्हाण, राहूल भिसे, अमर ओव्हाळे, आशिष ओव्हाळे, प्रियांश गवई, संतोष पैठणे फौजी, अक्षय बनकर, प्रविण बनकर, विकास बनकर, रजनिकांत इंगळे, मंगेश चवरे, विकास मघाडे, व तसेच युवा संवर्धन समिती मधील रामदास जाधव, सुमेध जाधव सर, सचिन साळवे सर, राहुल पवार सर, सिध्दार्थ धंदरे, राजेश बोर्डे पँथर, यांनी अथक परिश्रम घेवून या कार्यक्रमाचे नियोजन केले. या प्रसंगी अतिशय प्रभावीपणे कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुमेध जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन समितीचे अध्यक्ष निलेश राम जाधव यांनी केले.

## पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र चा पदनियुक्ती सोहळा संपन्न..!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

पत्रकार उत्कर्ष समिती या राज्यस्तरीय पत्रकार समितीचा पदनियुक्ती सोहळा रविवार दिनांक 13 एप्रिल 25 रोजी शासकीय विश्रामगृह पनवेल येथे संपन्न झाला. पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पदाधिकारी निवड प्रक्रिये वेळी उपस्थित सदस्यांना पत्रकार निवडपत्र दिले. यावेळी साप्ताहिक आवाज कोकणचा पुणे उपसंपादक श्री राम जाधव व श्री. रोहिदास जाधव यांची प्रदेश उपाध्यक्षपदी, तर श्री. दिलीप गायकर यांची प्रदेश सदस्य व श्री. ज्ञानेश्वर कोळी यांची प्रदेश सहसचिव सदस्य पदी निवड करण्यात आली.

कोकणचे सुपुत्र ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तीरपणकर आणि साप्ताहिक रायगड दर्पणचे मालक, मुद्रक व प्रकाशक डॉन एन के के यांची प्रदेश संघटक पदी निवड जाहीर करण्यात आली. कोकण विभाग अध्यक्ष पदी साप्ताहिक सत्याची वाटचालचे धडाडीचे पत्रकार श्री गोविंद धर्मा जोशी तर कार्याध्यक्ष पदी श्री. अलंकार भोईर व सचिवपदी एकनाथ सांगळे यांची निवड झाली. रायगड जिल्हा अध्यक्ष पदी आवाज महामुंबई चॅनलचे संपादक श्री मिलिंद खारपाटील, कार्याध्यक्ष पदी साप्ताहिक आर्या प्रहार चे संपादक श्री सुधीर पाटील व सचिव पदी श्री अशोक घरत , सहसचिव पदी श्री. राजेंद्र होळकर तर सदस्य म्हणून
आदित्य वाघ यांची निवड झाली. नवी मुंबई अध्यक्ष पदी निलेश उपाध्याय व सदस्य पदी तुषार पाटील यांची निवड करण्यात आली. साप्ताहिक आर्या प्रहार चे प्रतिनिधी श्री.



ऋषिकेश थळे यांची अलिबाग तालुका अध्यक्ष पदी, पनवेल तालुका अध्यक्ष पदी श्री संतोष जांभळे खालापूर तालुका अध्यक्ष पदी श्री राजू नायक व उपाध्यक्ष पदी
श्री संजय नगीना गुप्ता तर पेण तालुका अध्यक्ष पदी आई चॅनलचे संपादक श्री अक्षय पाटील, कार्याध्यक्ष पदी, श्री अरुण चवरकर व सदस्य पदी श्री. अमोल येरणकर, जय शिवराय चॅनलच्या संपादिका व डॅशिंग पत्रकार सौ. पूजा चव्हाण यांची उरण तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. पत्रकार उत्कर्ष समिती अंतर्गत स्थापित महिला उत्कर्ष समितीच्या कल्याण तालुका अध्यक्ष पदी सौ सुनीता सानप व पनवेल तालुका अध्यक्ष पदी सौ तेजश्री रघुवीर यांची निवड करण्यात आली. १६ मे २०१६ साली स्थापन झालेल्या या पत्रकार संघटनेला नऊ वर्ष पूर्ण होत असून दहाव्या वर्षात पदार्पण होणार आहे.आणि त्यानिमित वर्षभरात पत्रकारिता आणि अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.
पत्रकार उत्कर्ष समितीकडून पत्रकारांचा सन्मान, पत्रकारांसाठी अपघाती विंमा योजना, कोविड काळात मोफत अम्बुलन्स सुविधा, मोफत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, नवदुर्गा सन्मान, वर्षा सहल, आरती पुस्तकांचे वाटप, स्मरणिका असे अनेक उपक्रम राबविले जातात. यापुढे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील. आणि सर्व पत्रकारांना सोबत घेऊन ,त्यांचा योग्य सन्मान ठेवून हे कार्यक्रम करण्यात येतील अशी घोषणा डॉ अशोक म्हात्रे यांनी करताच उपस्थित पत्रकारांनी टाळ्या वाजवून त्यांच्या घोषणेचे स्वागत केले.येत्या वर्षभरात करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर समितीमध्ये राज्यातील 300 हून अधिक पत्रकारांचा समावेश असून 70 हून अधिक महिला पत्रकार आहेत. समिती सचिव डॉ. वैभव पाटील, खजिनदार श्री. शैलेश ठाकूर व सर्वच सदस्य पदाधिकारी यांच्या अथक परिश्रम व सहकार्यामुळे समितीचे जाळे राज्यभरात जोमाने पसरत आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अपूर्ण असलेल्या जलजीवन मिशन योजनेमुळे तालुक्यात पाणीटंचाई कायम

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तालुक्यातील अर्धवट स्थितीत असलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या कामामुळे आजही पनवेल तालुक्यात भीषण पाणी टंचाई कायम आहे. एप्रिल महिन्यात पाणी टंचाई गंभीर बनलेली आहे. अद्याप मे महिना बाकी आहे. जल जीवन मिशन योजनेची 131 ठिकाणी कामे सुरू आहेत. यापैकी 51 ठिकाणी विहीर आणि विंधण विहिरी खोदण्याचे काम सुरू आहेत. आपटा ग्रामपंचायत हद्दीतील टोकाची वाडी, सोनारवाडी, नेरे, टेमघर येथे विहिरीच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही. रीटघर येथे जुन्या विहिरीचे खोलीकरण सुरू करण्यात आले नाही. महाळुंगी आणि टॉवरवाडी येथे विहिरीचा गाळ काढण्यास सुरुवात करण्यात आलेली नाही. वाघाची वाडी आणि मालडुंगे येथील कुंभटेकडी, पाली खुर्द येथे विहिरीचे खोलीकरणाला सुरुवात नाही. वाजेपूर येथे बोअरवेलच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही. लोणीवलीवाडी, निताळे येथे विंधण विहिरीला सुरुवात करण्यात आली नाही. पनवेल तालुक्यात जलजीवन मिशन योजनेची कामे संथगतीने सुरू आहेत. १३१ कामांपैकी केवळ १७ कामे पूर्ण आहेत. ठेकेदारांच्या उदासीनतेमुळे अनेक ठिकाणची कामे अर्धवट स्थितीत आहेत. गेल्या तीन ते चार वर्षांपासून कामे सुरू आहेत. अनेक ठिकाणाचे भूस्तर आणि उच्च साठवण टाक्यांची कामे अर्धवट आहेत. मोजकेच ठिकाणची कामे पूर्ण असून काही ठिकाणी अद्याप सुरुवात करण्यात आलेली नाही. जलजीवन मिशन योजनेची कामे पूर्ण न झाल्याने पाणीटंचाईची समस्या पनवेल तालुक्यात कायम आहे.

**योजने अंतर्गत विहिरींचे काम पूर्ण**

घेराकिल्ला, गिरवले, देवळोली, नारपोली, शिवणसई, खानाव, देहरंग, धामणी, नेरेपाडा, चिंचवली, करंबेळी तर्फे तळोजे, महोदर, वांगणी तर्फे तळोजे, उमरोली, वाकडी, शांतीवन, गाढेश्वर, वाजे

**विंधण विहिरीचे (बोअरवेल) काम पूर्ण**

**आंबे तर्फे वाजे, चिंचवली तर्फे वाजे, कोंडप, आंबिवली**

# सब स्टेशनच्या केबलसाठी खोदलेल्या रस्त्यांमुळे अपघातांना आमंत्रण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



महावितरणने सब स्टेशनची केबल टाकण्यासाठी नवीन पनवेल शहरातील रस्ते खोदले. मात्र हे खोदलेले रस्ते अपघातांना आमंत्रण देत आहेत. नवीन पनवेल, सेक्टर 15 सब-स्टेशन ते आदई सर्कल येथे नेरे विभागासाठी बांधण्यात येत असलेल्या सबस्टेशनसाठी रस्ते खोदून केबल टाकण्यात आली आहे. त्यासाठी तीन ते चार महिन्याआधी रस्त्यावरती खड्डे खोदण्यात आले. मात्र या केबलवरती माती टाकून खड्डे कसेबसे बुजवले गेले मात्र यावर अद्यापही डांबरीकरण केलेले नाही. वारंवार तक्रार करूनही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. लवकरच खड्ड्याच्या कामाला सुरुवात होईल असे सांगितले जाते, मात्र परिस्थिती जैसे थेच आहे. त्यामुळे या खड्डे पडलेल्या रस्त्यातून नागरिकांना वाट काढावी लागते तसेच अपघातांना देखील आमंत्रण मिळते. त्यामुळे खोदलेल्या या रस्त्यांचे ताबडतोब डांबरीकरण करावे अशी मागणी शरद पवार गटाचे महाराष्ट्र राज्य सचिव आदित्य जानोरकर यांनी केली आहे.

# सापळी येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134,वी जयंती साजरी..

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार.**



डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. व त्यांचे शिक्षण मोठ्या कठीण प्रसंगातून पार पडले. त्यांनी शिका आणि संघटित व्हा संघर्ष करा असा त्यांनी सामान्य जनतेला मूलमंत्र दिला. शिक्षण हि सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणत्याही समाजावर भेदभाव न करता आरक्षण देऊन समाजाचा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सन्मान केला. आज प्रत्येकाचा जीवनप्रवास हा संघर्ष ग्रस्त आहे आणि आपापल्या समस्याने सर्वच ग्रस्त आहेत. हे सर्व आपण स्वतःकडे पाहून जगतो. पण जगाच्या पाठीवर महामानव जन्माला येतात. ते संघर्ष करतात तो स्वतःसाठी नव्हे तर, तो संघर्ष असतो अखिल मानव जातीसाठी आणि मानव जातीच्या मुक्तीसाठी असतो. असे मत मंचकावरून प्रमुख पाहुणे म्हणून बाळकडू जिल्हा पत्रकार. गजानन पवार पाटील सापळी.यांनी व्यक्त केले. सापळीमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सोंडा येथील सरपंच नवनाथ वाबळे पाटील यांनी सुद्धा वेळातला वेळ काढून भेट दिली व कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी गावातील महिला मुले पुरुष व बाळकडू चे स्टार जिल्हा पत्रकार गजानन पवार पाटील यांनी सुद्धा वेळातला वेळ काढून उपस्थिती दर्शवली. व गावातील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती आयोजक मंडळी, सामाजिक कार्यकर्ते निलेश मनवर, विलास इंगोले, तुळशीराम वाघमारे, आकाश कांबळे, कैलास इंगोले, लखन कांबळे, आदर्श मनवर, संघर्ष इंगोले, साहिल इंगोले, सुनील मनवर, ज्ञानेश्वर वाघमारे, नागेश वाघमारे, राज वाघमारे, यश वाघमारे, प्रज्वल मनवर, विक्की कांबळे, उत्कर्ष मेंढे, स्वप्निल मेंढे, मुरली मामा ढगे, संतोष हरिभाऊ ढगे, सोहम ढगे, विवेक कांबळे, विठ्ठल ढगे आचारी, दीपक कांबळे, रूपाली वाघमारे, यमुना वाघमारे, प्रज्ञा कैलास इंगोले, प्रज्ञा विलास इंगोले, प्रतिभा मनवर, संध्या मनवर, सुनिता कांबळे, रत्नाबाई कांबळे, सत्यभामा कांबळे, मैनाबाई इंगोले, शोभाबाई मनवर, सानिका इंगोले, संघवी इंगोले, सोनाली मेंढे, स्नेहल वाघमारे, निकिता मनवर, प्राची मनवर, भावना मेंढे, या सर्वांच्या उपस्थितीत भारतरत्न,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी.जयंती सापळी येथे भव्य दिव्य सोहळ्यात साजरी करण्यात आली..

# बाजारपेठेत कोयता नाचवत दहशत पसरविणाऱ्या तिघांच्या शिरूर पोलिसांनी आवळल्या मुसक्या




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

शिरूर पोलिसांची कारवाई, शिरूर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी शिरूर पोलीस ठाणेचा पदभार स्वीकारल्यापासून नेहमीच प्रयत्नशील आहेत, पोलीस ठाणेकडील कर्मचाऱ्यांना सोबत घेवुन शिरूर परिसरांत त्यांची चांगलीच करडी नजर आहे, त्यांच्या कामगिरीवर सर्वसामान्य जनता देखील प्रसन्न आहे, पदभार घेतल्यापासून शिरूर पोलीस ठाणेच्या परिसरांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील आहेत, शिरूरच्या बाजारपेठे मधील विशाल कृषी सेवा केंद्रात घुसून कोयत्याच्या धाकाने मारहाण करणाऱ्या तिघां आरोपींना अवघ्या तासांत शिरूर पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत, या जलद आणि प्रभावी कारवाईने शिरूर पोलिसांनी स्थानिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण केला आहे, याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीवरून 5 एप्रिल रोजी दुपारी 2 वाजता दुकान मालक शिवम शिंदे यांच्यावर परवेज उर्फ पप्प्या पठाण (वय 19 ) रुपेश चित्ते (वय 22)आणि ओंकार जाधव (वय 26) सर्व रा. ताडोंबाची वाडी ) यांनी हा हल्ला केला आहे, आरोपींनी दुकानात गोंधळ घालत शिवीगाळ केली कात्रीने डोक्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले, व कोयत्याच्या धाकाने परिसरांत दहशत पसरवली, अनेक दुकाने बंद झाली आणि नागरिकांनी तिथून पळ काढला संतोष पाचरणे यांच्या फिर्यादीवरून शिरूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी विशेष पथक स्थापन करीत तात्काळ जलद गतीने तपास सुरू केला, अल्पावधीत तिघांना आरोपींना अटक करून गुन्ह्यात वापरलेला कोयता जप्त करण्यात आला, यावेळी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे म्हणाले शहरांत दहशत माजविणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल, सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदेश केंजळे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण सहाय्यक उपनिरीक्षक राजेंद्र साबळे हवालदार जगताप आमदार सचिन भोई नितेश थोरात विजय शिंदे निरज पिसाळ निखिल रावडे रवींद्र आव्हाड अजय पाटील यांच्या पथकांने ही कारवाई केली आहे

# वृद्ध दापत्यांना धमकावून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्यांना निफाड पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक विनोद गायकवाड**




निफाड तालुक्यातील गाजरवाडी शिवारात रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरट्यांनी वृद्ध दापत्यांना हातातील धारदार शास्त्राचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देत चोरी करण्याचा प्रयत्न केला असून या घटनेचा निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, सविस्तर वृत्त असे की गाजरवाडी शिवारात रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास तिघांनी काळे कपडे घालून व एकाने पोपटी रंगाचे कपडे घालून हातात लोखंडी धारदार कोयते घेऊन चोरटयांनी घरात प्रवेश केला फिर्यादीची पत्नी व नातू यांना दोन चोरट्यांनी दाबून धरले व फिर्यादीस दोघा चोरट्यांनी दाबुन धरत तोंडाला चिकटटेप लावण्याचा प्रयत्न केला व आम्ही तुम्हा तिघांनाही मारून टाकू असा दम दिला. या झटापटीत चोरट्याने फिर्यादीचे हातावर कोयत्याने मारून त्यांना जखमी केले आहे या घटनेची नोंद निफाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून गुरनं.१०५/२०२५बि.एन.एस.११८(१),३३३,३५१(२),३(५),३०९(६),६२, याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे वरील आरोपी हे सराईत गुन्हेगार आहे त्यांचे कडून विंचूर निफाड येथील चोरीच्या एकूण पाच मोटरसायकल जप्त करण्यात आले असून दोन लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, या गुन्ह्यातील आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांनी त्र्यंबकेश्वर ,हरसुल, निफाड, लासलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. नासिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ .निलेश पालवे, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव ,सहा.पो. नि. ईश्वर पाटील, तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम ,पो. हवा. किरण ढेकळे ,कपालेश्वर ढिकले, अनिल शेरेकर ,संजय वाघ ,रवींद्र बारहाते, पो.ना, नितीन सांगळे, सारिका जाधव ,मनीषा गायकवाड, पुनम शिंदे, पो. शि. विनोद जाधव, राजेंद्र दरोडे ,धनंजय जाधव ,स्वप्निल शिरसाट, योगेश आव्हाड, विक्रम लहाने तसेच नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडे तांत्रिक विश्लेषण कर्मचारी प्रदीप बहिरम ,हेमंत गिलबिले, यांचे पथकाने वरील संशयित आरोपी व गुन्हेतील कोयता व पाच मोटरसायकल असे एकूण दोन लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल 24 तासाच्या हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम हे करीत आहे,

# अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

१४ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अग्निशमन सेवा सप्ताह १४ एप्रिल २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन विभाग विभागामार्फत मार्गदर्शक तत्त्वानुसार सप्ताह पाळण्यात येतो. यावेळी विविध जनजागृती पर कार्यक्रम, मॉक ड्रिल, वाहनांची रॅली संपूर्ण कार्यक्षेत्रात आयोजित केली जाते. मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशामक अधिकारी विजय राणे, उपमुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे यांनी सिडको महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. १४ एप्रिल रोजी शहीद जवानांना खारघर अग्निशामक केंद्र येथे श्रद्धांजली वाहण्यात आली. १५ ते १९ एप्रिल दरम्यान रहिवासी इमारतींमध्ये, व्यावसायिक इमारतींमध्ये, रुग्णालयांमध्ये, शैक्षणिक इमारतींमध्ये आणि वेअर हाऊसमध्ये मॉकड्रिल घेण्यात येईल तर विविध रहिवासी सोसायटीमध्ये आगीपासून सुरक्षाबाबत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन शिबिरे तसेच प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. २० एप्रिल रोजी मुंबई येथे सांगता समारंभ होणार आहे. लोकांमध्ये आगीच्या धोक्यांबाबत जनजागृती व्हावी तसेच इमारतीतील यंत्रणा कार्यान्वित ठेवून एखाद्या ठिकाणी आग लागलयास तत्काळ उपाययोजना करता यावी हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

# डोंगराची काळी मैना बहरली

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी : राजेंद्र टोपले, वांगण सुळे ,सुरगाणा



भर उन्हात बसली धरून सावली गुरं
न्हाई चिंता त्यांची तिन्ही सांजपातूर
चला दोघं मिळुनी चढू टेकडीवर
चढता चढता धरा हात की वाट नसे रुंद
जाळीमंदी पिकली करवंद

आदिवासी भाग म्हटला की, तिथे डोंगराळ भाग येणार आणि तिथे डोंगराळ भाग असल्याने वेगवेगळ्या प्रकारची प्रजातीची वनस्पती सृष्टी, वेली, झाडे झुडपे, रानमेवा, रानभाज्या, रानफळे या सर्वांची उपलब्धता म्हणजे आदिवासींना निसर्गाने दिलेला एक वरदानच आहे. आदिवासी भागातील बांधवांना जंगलातील वनस्पती बरोबरच रानफळांचे, रानमेवांचे आस्वाद हे वसंत ऋतूत चाखायला मिळत असतात. यापैकी एक म्हणजे ' करवंद ' हे फळ पिकून काळ्या रंगाने झाडावर बहरून गेलेली असतात. करवंदाला डोंगरची काळी मैना असेही संबोधले जाते.करवंदे पिकली असतांना जंगलातील विविध प्रकारचे पक्षी करवंदाच्या झाडावर घिरट्या मारत पिकलेल्या फळांवर यथेच्छ ताव मारत मोठ्या आवडीनं खात असतात. साधारणतः जानेवारी महिन्यापासून करवंदाच्या झाडाला पांढऱ्या रंगाची फुले येतात. नंतर हिरव्या रंगाची लहान लहान फळे येतात. एप्रिल, मे महिन्यात करवंद हे रानफळ पिकून पूर्णपणे काळ्या रंगाच्या फळांनी भरून जाते. करवंद हे रानफळ आंबट, गोड, कडु ह्या वेगवेगळ्या चवीची असून मोठ्या प्रमाणात आढळतात. कच्च्या करवंदापासून खारना , लोणचं असे अनेक पदार्थही बनवले जातात. आदिवासी भागात जवळपास डिसेंबर महिन्यापासून लग्न सराईला सुरुवात होते. या लग्न समारंभात,तसेच विविध कार्यक्रमात अनेक वनस्पती, पशु पक्षी, वेली, फुले म्हणजेच निसर्गावर आधारित अनेक प्रकारचे लोकगीते गायली जातात. आदिवासी बांधव हा पिढ्यानपिढ्या जंगलात, दरी खोऱ्यात राहत असल्याने निसर्गाप्रति असलेले प्रेम, भावना या लोकगीताच्या माध्यमातून व्यक्त करण्यात येतात. आदिवासी महिलांच्या तोंडून साखरपुडा, लग्न कार्यात वेगवेगळ्या प्रकारची लोकगीते गायली जातात.

बारीक करवंदे करवंदे तुज पान,
बारीक करवंदे तुज पान वं .
गोणी भरल्या भरल्या हळदीच्या,
गोणी भरल्या हळदीच्या वं .

अशा प्रकारच्या अतिशयोक्ती अलंकारांनी समृद्ध अशी निसर्ग वर्णन असलेली ही लोकगीते लग्न कार्य, साखरपुडा व इतर पारंपरिक कार्यक्रमात आजही मोठ्या प्रमाणात आनंदाने गायली जातात. त्याचप्रमाणे करवंद हे आरोग्यदायी असल्याने आदिवासी बांधव मोठ्या आनंदाने या रामफळांचा आस्वाद घेतांना आपल्याला आजही दिसतात.

**पिकलेली गोड व चविष्ट करवंद**

# तळोजा ग्रामीण भागातील महिलांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



ग्रामीण भागातील महिलांकडून चालवल्या जाणाऱ्या दुग्धव्यवसायांपासून ते शेतीसाठी उजाड जमीन सुपीक करण्यात आणि गावकऱ्यांना उद्योजक बनवण्यात दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडने आपल्या 'इशान्य फाउंडेशन' या सीएसआर विभागाच्या माध्यमातून सन्मान आणि स्वावलंबनाचे महत्वाचे पाऊल उचलले. त्या अनुषंगाने तळोजा परिसरातील गावांमधील ग्रामस्थांच्या जीवनात आर्थिकदृष्टया सबलीकरणासाठी रोजगाराचे सकारात्मक प्रोत्साहन मिळाले आहे. वर्षानुवर्षे, दीपक फर्टिलायझर्सच्या तळोजा येथील कंपनी जवळील गावांमध्ये सीएसआर अंतर्गत विविध उपक्रमांद्वारे सर्वांगीण ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. हे उपक्रम केवळ मदत न करता तर स्वः सक्षम करण्याबद्दल आहेत. योग्य गरजेनुरूप मदत, कौशल्ये आणि आत्मविश्वासासह व्यक्तींना त्यांची स्वतःची क्षमता शोधण्यात मदत करते. चिंचवली गावात राहणाऱ्या मनीषा गोटीराम रिकामे यांचं संपूर्ण कुटुंब पतीच्या शेतीवर अवलंबून होतं. पण दीपक फर्टिलायझर्सच्या दुग्धव्यवसायविकास प्रकल्पात सहभागी झाल्यावर परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला. गायींची निगा, पोषण आणि प्रशिक्षणाच्या मदतीने त्यांनी आपल्या छोट्याशा गोठ्याला स्थिर उत्पन्नाचे साधन बनवले. त्यामुळे "मी पूर्णपणे माझ्या पतीच्या अनिश्चित उत्पन्नावर अवलंबून होते. जेव्हा दीपक फर्टिलायझर्स ने आम्हाला दुग्धव्यवसाय प्रशिक्षण दिले आणि दुधाळ गायी खरेदी करणायास मदत केली, तेव्हा सर्व काही बदलले. आता, मी रोज स्थानिक ग्राहकांना व खाजगी दूध डेअरीला दूध विकते आणि माझ्या दोन मुलींच्या आणि एका मुलाच्या शाळेचे शुल्क व इतर खर्च यातूनच भागवते. प्रथमच, मला आत्मविश्वास वाटतो, माझ्या कुटुंबाच्या भविष्यासाठी माझा हातभार लागत आहे"असे मनीषा रिकामे यांनी स्पष्ट केले. खैरवाडी गावातील अल्पभूधारक शेतकरी कालीबाई आणि श्रावण भगत यांनी जोपर्यंत त्यांनी दीपक फर्टिलायझर्स राबवत असलेल्या "वाडी" विकास उपक्रमात भाग घेतला नव्हता तो पर्यंत जवळजवळ शेती सोडून देण्याचा विचार केला व्होता.त्यांना शेतातून पुरेशे उत्पन्न मिळत नव्हते. तांत्रिक मार्गदर्शन आणि सुधारित पद्धतींमुळे, त्यांच्या शेतातून होणारे उत्पन्न वाढताना दिसत आहे."आमची काही जमीन पडीक होती तर उर्वरित क्षेत्रातून पुरेशे उत्पन्न मिळत नव्हते. पण दीपकफर्टिलायझर्सच्या वाडी प्रकल्पाद्वारे, मी आंब्याची झाडे (केसर वाण) लावली आणि आंबा लागवडीच्या सुधारित पद्धती शिकल्या, तसेच आंबा लागवडीबरोबर मला भाजीपाला लागवड करणेही शिकवले. मी पडीक जमिनीवर आंबा लागवड केली व नवीन भाजीपाला लागवड करण्यास सुरुवात केली. पूर्वी मी फक्त १० ते १५ आर क्षेत्रावर भाजीपाला लागवड करत होतो आणि आता मी ४० ते ५० आर क्षेत्रावर लागवड करत आहे. मी या वर्षी पहिल्यांदाच माझ्या बागेतील आंबे विकले. हे स्वप्नासारखे वाटले ज्या जमिनीवर मी आशा सोडली होती त्याच जमिनीतून मला आता उत्पन्न मिळत आहे,"असे कालीबाई यांनी सांगितले. नितलसच्या वसुधा वसंत पवार यांच्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य ही एक दूरची कल्पना होती. पण दीपक फर्टिलायझर्सच्या मदतीने, त्या एक लहान नाष्टा व चहा सेंटर उभारू शकल्या. त्यांनी या संदर्भात बोलताना "माझे स्वतःचे छोटे व्यवसाय असावे असे नेहमीच स्वप्न होते, पण आर्थिक परिस्तिथी मुळे ते शक्य होत नव्हते. जेव्हा दीपक फर्टिलायझर्सने मला योग्य प्रशिक्षणासह नाष्टा व चहा सेन्टर उभारण्यास मदत केली, तेव्हा मला एक व्यवसायिक महिला म्हणून एक नवीन ओळख मिळाली. आता मी दररोज कमवते आणि माझ्या कुटुंबाची काळजी घेऊ शकते," अशी अभिमानाने प्रतिक्रिया दिली. सीएसआर उपक्रम राबवत असताना दीपक फर्टिलायझर्स लोकसहभाग आणि शाश्वत विकासावर भर देत आहे. कंपनीच्या उपक्रमांबद्दल बोलताना कॉर्पोरेट गव्हर्नन्स अध्यक्ष नरेश पिनिसेट्टी यांनी म्हंटले कि, "आमचा समुदायाशी संबंध फक्त आमच्या प्लांटच्या सीमांपुरता मर्यादित नाही. आम्ही या गावातील लोकांसोबत चालण्यावर विश्वास ठेवतो, त्यांना चांगले उपजीविका साधन, आरोग्य आणि चांगले प्रशिक्षण देण्यासाठी प्राधान्य देतो. आमच्या उपक्रमाचे खरे यश हे आहे की आम्ही आमच्या सभोवतालच्या समुदायाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतो". दीपक फर्टिलायझर्स सीएसआर उपक्रम राबवत असताना दुग्धव्यवसाय पासून ते बागायती शेतीपर्यंत आणि लहान दुकानांपर्यंत, तळोजा परिसरातील समुदायासाठी एक आशेचा किरण ठरत आहे. कंपनी फक्त आर्थिक मदतीवर भर न देता सक्षमीकरण शाश्वत विकास यावर काम करत आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

# जिल्हा परिषद शाळा माळशेंबा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा/प्रतिनिधी**
**करण धोंगडे..**

आज दिनांक १४/०४/२०२५ रोजी जिल्हा परिषद शाळा माळशेंबा येथे महामानव बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजुभाऊ पवार यांनी प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन केले त्यानंतर सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी मित्रांनी सुद्धा प्रतिमेचे पूजन केले,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर इयत्ता तिसरीपासून ते सातवी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, राजगुरू सर यांनी सुद्धा महामानवाबद्दल आपले विचार मांडले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सन्माननीय रवींद्र महाडिक सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्यावरती आपल्या बोलण्याच्या माध्यमातून प्रकाश टाकला,यावेळी रवींद्र महाडिक सर असे म्हणाले की, शिक्षा के संबधमे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जी ने कहां था जिन्हे अपने दुःख से मुक्ती चाहिये, उन्हे लढणा होगा, और जिन्हे लढना है, उन्हे पहले पढना होगा क्यूकी ज्ञान के बिना यदि आप लढणे गये तो आपकी हार निश्चित है, इसीलिए पहिले आपको पढना होगा. यावेळी रवींद्र महाडिक मुख्याध्यापक, संजय राजगुरू सहाय्यक अध्यापक, गणेश हाके विषय शिक्षक, सौ.विद्या हाके सहाय्यक शिक्षिका,देविदास सोसे सहाय्यक शिक्षक, राजूभाऊ पवार शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष,यावेळी या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. संजीवनी जवंजाळ हिने केले तर आभार प्रदर्शन महाडिक सर यांनी केले,यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंगणवाडी केंद्रामध्ये महामानव,बोधिसत्व,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती साजरी करण्यात आली,यावेळी शिस्तप्रिय अंगणवाडी सेविका आशाताई देशमुख उपस्थित होत्या.



# वृद्ध दाम्पत्याला धमकावून चोरी करणाऱ्या टोळीतील दोघांना निफाड पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

*एक महिन्यापूर्वी गाजरवाडी तालुका निफाड येथील राहणाऱ्या वृद्ध दाम्पत्याला धमकावून जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना निफाड पोलिसांनी जेरबंद केल्याची माहिती पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी दिली.यातील आरोपींकडून निफाडसह इतर ठिकाणी चोरलेल्या ५ मोटारसायकल ताब्यात घेतल्या आहेत २० मार्च रोजी रात्री साडे दहा वाजेच्या सुमारास गाजरवाडी शिवारात चार सराईत गुन्हेगारांनी हातात लोखंडी रॉड, कोयता घेवुन दोघांनी पत्नी दुबाई व नातु आयुष यांना दाबुन धरले व दुसरे दोन इसमांनी फिर्यादीस दाबुन धरुन आरडा ओरडा केला तर तिघांना पण कोयत्याने मारुन टाकु असा दम देवुन फिर्यादीचे तोंडाला चिकट पट्टी लावण्याचा प्रयत्न करतांना झटापटीत आरोपीचे हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादीचे हातावर मारले व धाक दाखवुन लुटमार करण्याचा प्रयत्न केला म्हणून निफाड पोलिसात गुन्हा दाखल होता. नाशिक ग्रामिण जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधिक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे यांनी सदर घटनेतील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी निफाड पोलीस ठाणेस सुचना दिल्या होत्या. त्या नुसार निफाड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सपोनि. पाटील निकम, व तपास पथकातील पोलीस अमंलदार यांनी गुन्ह्यातील फिर्यादी यांचेकडे चौकशी करुन यातील अज्ञात आरोपीचा परिसरात शोध घेतला असता व घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले असता काही संशयीत हालचाली वरुन सदर आरोपी हे आसपासचे असल्याचा तर्क लावुन तपास सुरु केला. तपास पथकातील पोलीस हवालदार अनिल शेरेकर व विनोद जाधव यांनी एक आरोपीचा चाकण पुणे येथुन शोध घेर ताब्यात घेतले दुसरा आरोपी विंचुर येथुन ताब्यात घेतला. चौकशीत गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांनी त्रंबकेश्वर पोलीस स्टेशन, हरसूल पोलीस स्टेशन,लासलगाव पोलीस स्टेशन हद्दीत चोरी केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्या ताब्यातून पोलिसांनी विचुर, निफाड येथील चोरीच्या एकुण ५ मोटार सायकल जप्त करण्यात आले आहे. आरोपीचे इतर साथीदारांचे नावे निष्पन्न झाले असुन त्यांचा शोध घेणे चालु असल्याचे पोलीस निरीक्षक गुरव यांनी सांगितले.




## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त नवीन पनवेलमध्ये भीम जयंती महोत्सव साजरा

### प्रख्यात गायक आनंद शिंदे, विशाल - साजन जोडीच्या संगीत कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय घटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त नवीन पनवेल सेक्टर २ येथे पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तसेच मागासवर्गीय समाजाचे नेते अड. प्रकाश बिनेदार यांच्यावतीने भीम जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.यावेळी महोत्सवाला पनवेल महानगर पालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आंबेडकरी चळवळ पुढे नेण्याचे काम अड. प्रकाश बिनेदार आणि सहकारी करत आहेत, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी करत तमाम जनेतला त्यांनी बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात प्रकाश बिनेदार यांच्यावतीने सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा तसेच विद्यार्थ्यांचा सत्कार देखील करण्यात आला. या महोत्सवात प्रख्यात गायक आनंद शिंदे यांच्या गाण्याचा मनमुराद आनंद पनवेल वासियांना लाभला. या भीम महोत्सवाची सुरुवात धर्मगुरू गौतम बुद्ध, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पसुमनाने पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमल, माजी नगरसेवक राजू सोनी, तेजस कांडपिले, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, ज्येष्ठ कार्यकर्ते जगदीश घरत, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेविका अड. वृषाली वाघमारे, अड. जितेंद्र वाघमारे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुकाध्यक्ष रुपेश ठोंबरे, अतुल मोकल आदींसह भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्री यशवंत चव्हाण यांना 'राज्यस्तरीय आदर्श गुणवंत कर्मचारी "पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**सणसर:- विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयाचे कर्मचारी श्री यशवंत भगवान चव्हाण यांच्या कार्याची दखल 'साप्ताहिक विशाल क्रांती' व 'विशाल क्रांती न्यूज' या वृत्तपत्राच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने घेण्यात आली.श्री यशवंत भगवान चव्हाण यांनी सपत्नीक "राज्यस्तरीय आदर्श कर्मचारी " पुरस्कार मा. श्री. धैर्यशील माने दादा(खासदार), मा.श्री.अशोकराव माने बापू( आमदार )यांच्या शुभहस्ते कॉ.मा.श्री. विजयानंद माने(उपाध्यक्ष महाराष्ट्र दूरसंचार परिमंडळ BSNL)यांचे अध्यक्ष खाली हा पुरस्कार स्वीकारला.या पुरस्काराचे वितरण रविवार दिनांक 13/4/2025 रोजी इचलकरंजी येथे एका सुंदर अशा कार्यक्रमात विद्यालयातील उपशिक्षक श्री. दीपक भोसले सर,श्री.संजय भोसले सर,श्री.राहुल कुंभार सर,श्री.शामराव गायकवाड,
श्री.विकास भाऊ फुले,यांच्या उपस्थितीत देण्यात आला. तेव्हा सत्येंद्र राजे नाईक निंबाळकर (सरकार) उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन मा.श्री.आप्पासाहेब बंडू भोसले( संपादक साप्ताहिक विशालक्रांती), मा.श्री.संजय धुळगोंडा पाटील (उपसंपादक विशाल क्रांती न्यूज चॅनल ) यांनी केले. या पुरस्काराच्या निमित्ताने श्री यशवंत भगवान चव्हाण यांचे अभिनंदन श्री.छत्रपती शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष, सचिव, व सर्व संचालक यांच्या माध्यमातून व गावचे सरपंच श्री.यशवंत भाऊ नरुटे पाटील आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुनील सर्जे सर सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यावतीने करण्यात आले.

## रायते येथे सर्व गावकरी ग्रामस्थ यांनी आपली उपस्थिती राहुन

### डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 जयंती धडाके बाज साजरी केली

दै युवक आधार
/कल्याण रशीद शेख

कल्याण तालुक्यातील हे एक मेव ग्रामीण भागातील रायते गाव आहे की तीथे कोणतही कार्य असो मगं ते लगन असो की जयंती असो सर्वच गावकरी एकत्र येऊन आपले कार्य पार पाडतात कुठेही गाल बोटं न लागता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व कार्यक्रमाचा आनंद घेऊन उपस्थितांना शुभेच्छा दिल्यात पोलिस डिपार्टमेंट व सरपंच मेडाम व आजी माजी व ज्येष्ठ श्रेष्ठ गावकरी ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकार भारतरत्न परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती धडाके बाज साजरी करण्यात आली आहे




## शिष्याच्या कंठात झाले गुरुंचे अवतरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

प्रख्यात संगीततज्ञ उस्ताद अस्लम हुसैन खान यांच्या पुण्यस्मृतीप्रित्यर्थ अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ नवी मुंबई व हिंदुस्तानी संगीत अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या खुशरंग संगीत महोत्सवात संगीत पर्वणी सादर होताना शिष्याच्या कंठातून गुरुंचे अवतरण झाले. वाशी येथील अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळाच्या सभागृहात झालेल्या या महोत्सवास प्रमुख मान्यवर म्हणून ज्येष्ठ सितारवादक उस्ताद रफ़त खान, ज्येष्ठ शास्त्रीय गायक 'भजन महर्षी' पं. निवृत्ती बुवा चौधरी, 'भजन रत्न' पं. महादेव बुवा शहाबाजकर, जागतिक कीर्तीचे डॉ. प्रितेश आचार्य, सिडको युनियनचे माजी अध्यक्ष नीलेश तांडेल, विनोद पाटील, जे. टी. पाटील, भारतीय सनगर समाजाचे उपाध्यक्ष अनिल राऊत, शास्त्रीय गायक महेश कुलकर्णी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रथम प्रस्तुती वाराणसीच्या डॉ. शिवानी आचार्य यांची होती. त्यांच्या गायनाला तबल्यावर पं. निषाद पवार व संवादिनीवर अभिषेक काटे यांची साथ लाभली. त्यांनी राग मधुवंती मध्ये विलंबित एकतालात बांधलेली पारंपरिक बंदिश "तेरो गुण गाऊं" सादर केली. त्यानंतर त्यांनी गुरु प्रभावरंग यांच्या रचनेवर आधारित "गुरु चरणन मे ज्ञान विराजे" ही तीन तालातील बंदिश सादर केली. यानंतर चैती "राम जी के भइले जनमावा हो रामा" सादर करून श्रीरामलल्लाच्या स्वरूपाचे संगीतमय चित्रण केले. त्यानंतर शिव महिमेवरील दादरा "कहा नाही हौ भोला" सादर करत भक्तिभावाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणाचा समारोप श्रीकृष्ण भजनाने झाला. द्वितीय प्रस्तुती प्रा. विश्वास जाधव यांचे स्वतंत्र तबलावादन होते. त्यांना संवादिनीवर साथ केली अभिषेक काटे यांनी. प्रा. विश्वास यांनी तबल्याच्या विविध लयकारीतून तिहाई, रेले व कायदा यांचा सुंदर संगम सादर केला. अंतिम प्रस्तुती रायगड जिल्ह्याचे सुपूत्र विद्वान शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांनी सादर केली. त्यांनी आपल्या गुरु उस्ताद अस्लम खान खुशरंग यांना स्वरांजली अर्पण केली. त्यांना तबल्यावर पं. विनायक नाईक आणि संवादिनीवर अभिषेक काटे यांची साथ लाभली. पं. उमेश चौधरी यांनी राग केदार मध्ये विलंबित एकतालातील "ए बन ठन का" ही बंदिश सादर केली. त्यानंतर द्रुत तीन तालात "कान्हा रे नंद नंदन" ही रससिक्त बंदिश, तर "तनादि तन तदीम दीम तन देरेना" असा तराना सादर करत लयकारीचे उत्कृष्ट दर्शन घडवले. त्यानंतर राग भैरवी मध्ये झपतालातील देवी स्तुती "भवानी दयानी", आणि शेवटी महाराष्ट्राच्या पारंपरिक लोकशैलीतले भजन "हेची दान देगादेवा" सादर करून आपल्या गायनातून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सुरेख संचालन सोपान आढव यांनी केले.



## बेलवाडीत महिको कंपनीचा खरीप महोत्सव साजरा

**दैनिक युवक आधार**
**सणसर:- विकास क्षत्रिय**

बेलवाडी तालुका इंदापूर येथे महिको प्रा.ली.जालना यांच्यावतीने होऊ घातलेल्या खरीप हंगामाच्या अगोदर खरीप महोत्सव संपन्न झाला.
या कार्यक्रमाला बेलवाडी, थोरातवाडी, काझड व फलटण येथून मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती फलटणचे संचालक श्री.विजयकुमार शेडगे,फलटण तालुका सरपंच परिषदेचे अध्यक्ष श्री.राहुल इवरे बेलवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच माणिक जामदार,सदस्य श्री. प्रताप पवार, प्रकाश जामदार, दत्तात्रय जाधव, शिवाजी मुळीक, दत्तात्रय जामदार, सुनील भोसले, अजित पवार, नानासाहेब कदम आदी पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महिको कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक श्री.अजित डांबे यांनी महिको कंपनीचे खरीप हंगामातील लोकप्रिय मका वाण एम,आर,एम 3845 व एमआर एम 4064 या वाणांविषयी माहिती दिली.उच्च उत्पादन क्षमता असणाऱ्या 3845वाणाचे कणीस मोठे व पूर्ण क्षमतेने भरलेले असते त्यामुळे त्याचे उत्पन्न 40 क्विंटल पेक्षा जास्त मिळते, आतील बिट्टी लहान असल्यामुळे दाणे लांब, मोठे व वजनदार असतात त्यामुळे शेलिंग टक्केवारी जास्त मिळते, कणीस एवढे मोठे असते की कणसाला 16 ते 18 लाईन असतात व एका ओळीत 42 ते 45 दाणे असतात, दाण्यांचा कलर गर्द नारंगी आसतो त्यामुळे बाजारभाव जास्त मिळतो, मका काढणीपर्यंत हिरवी गार राहते त्यामुळे उत्पन्ना बरोबरच जनावरांना चाराही उपलब्ध होतो.. असा हा मका वाण 3845 येणाऱ्या खरीप हंगामात शेतकरी बांधवानी आपल्या शेतात करून जास्तीत जास्त उत्पन्न घ्यावे असे आवाहन श्री.अजित डांबे यांनी केले. कार्यक्रमामध्ये महिकोचे चांगले उत्पन्न काढलेल्या शेतकऱ्यांचे सत्कार करण्यात आले,उपस्थित शेतकऱ्यांमधून लकी ड्रा काढून विजेत्यांना आकर्षक बक्षीस देण्यात आली .कार्यक्रमाच्या माध्यमातून महिको कंपनीने शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साह वाढला आहे असे आभार प्रदर्शन करताना ॲडव्होकेट श्री.शरद जामदार यांनी सांगितले. यावेळी असंख्य शेतकऱ्यांनी या कंपनीच्या खरीप महोत्सवाचा लाभ घेतला. यावेळी महिको कंपनीचे इंदापूर तालुका प्रतिनिधी म्हणून शुभम पवार यांची निवड करण्यात आली.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यासह कंत्राटदाराला समज देऊन

### तात्काळ काम सुरू करण्यास भाग पाडू - आमदार बबनराव लोणीकर यांचा गावकऱ्यांना दिलासा

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**:प्राचार्य जगन्नाथ रासवे**

विधानसभा निवडणुकीपूर्वी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून बेलोरा ते केंधळे पोखरी हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आला होता. रस्त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश निघालेला आहे असे असताना मागील एक ते दीड वर्षापासून संबंधित कंत्राटदार काम करत नाही. परिणामी अथक परिश्रमानंतर मंजूर झालेला हा रस्ता आत्तापर्यंत का सुरू झाला नाही हे आम्हा गावकऱ्यांच्या समजण्यापलीकडे आहे संबंधित कंत्राटदार व त्यांच्या लोकांशी संपर्क केला असता हे काम आम्हाला परवडत नाही जुन्या रेट प्रमाणे आहे जुने रेट अत्यंत कमी आहेत त्यामुळे आम्ही हे काम करणार नाही अशा प्रकारचे उत्तरे ऐकायला मिळतात असे केंदळे पोखरी व बेलोरा येथील ग्रामस्थांच्या वतीने आमदार बबनराव लोणीकर यांना देण्यात आलेला निवेदनात म्हटले आहे. केंधळे पोखरी व बेलोरा येथील सरपंच आणि इतर ग्रामस्थांनी आज आमदार बबनराव लोणीकर, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता उप अभियंता यांच्यासह जिल्हाधिकारी जालना यांच्या नावे असणारे निवेदन आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे सुपूर्द केले आमदार बबनराव लोणीकर यांनीच हा सिमेंट रस्ता अथक परिश्रमातून मंजूर केला असून ३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सदरील कंत्राटदार काम करत नाही याविषयी आमदार लोणीकर हेच न्याय मिळवून देऊ शकतात याची आम्हाला खात्री आहे म्हणून हे निवेदन आम्ही आमदार बबनराव लोणीकर यांच्यामार्फत मुख्य अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांना देत आहोत असे केंधळे पोखरी चे सरपंच आदित्य केंधळे व बेलोराचे माजी सरपंच श्रीराम राठोड यांनी स्पष्ट केले. संबंधित कंत्राटदार हे काम करण्यास तयार नसेल तर आपण याची दखल घेत फेरनिविदा करून हे काम दुसऱ्या कंत्राटदाराकडे सोपवावे व रस्त्या अभावी आम्हा गावकऱ्यांना होणारा प्रचंड त्रास कमी करण्यास मदत करावी. या रस्त्याचे प्रचंड हाल झाले असून मुलांना शाळेत जाण्यासाठी अबाल वृद्धांना दवाखान्यात जाण्यासाठी गर्भवती महिलांच्या प्रसूतीसाठी या रस्त्यावरून प्रचंड त्रास होत आहे. असेही या निवेदनात स्पष्ट केले आहे. एक तर संबंधित कंत्राटदाराने हे काम तात्काळ सुरू करावे किंवा आपण संबंधित कंत्राटदार काम करत नाही या बाबीची दखल घेत नवीन निविदा काढून दुसऱ्या कंत्राटदाराकडे हे काम सोपवावे केंधळे पोखरी व बेलोरा या दोन्ही गावातील नागरिक लहान मुले माता भगिनी वृद्धांसह मा.जिल्हाधिकारी किंवा छत्रपती संभाजीनगर येथील आपल्या दालनात आमरण उपोषणासाठी बसल्याशिवाय पर्याय राहणार नाही. आपण आमच्या या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कारवाई करतील अशी अपेक्षा गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे. गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आलेले निवेदन मुख्य अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता यांना देऊन संबंधित कंत्राटदार काम करत नसेल तर फेरनिविदा करून लवकरात लवकर दुसऱ्या कंत्राटदाराला काम देऊ व लवकरात लवकर बेलोरा व केंधळे पोखरी येथील नागरिकांच्या रस्त्याचा प्रश्न सोडवू अशा शब्दात माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी ग्रामस्थांना दिलासा दिला.



# जागतिक कीर्तीच्या फाईन ज्वेलरी ब्रँडने मुंबई मध्ये आपले दुसरे स्टोर लॉन्च केले

### झेन डायमंडचे स्काय सिटी मॉल- बोरिवली मध्ये शानदार लोकार्पण

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

**मुंबई**, १५ एप्रिल २०२५: झेन डायमंड या जगभरातील ४०० पेक्षा जास्त स्टोर्समध्ये असलेल्या, जागतिक कीर्तीच्या फाईन ज्वेलरी ब्रँडने मुंबईमध्ये आपले दुसरे स्टोर लॉन्च करून भारतात आपले स्थान अजून मजबूत केले आहे. बांद्रया मध्ये फ्लॅगशिप स्टोरची सुरुवात यशस्वी ठरल्यानंतर झेन डायमंडने आता स्काय सिटी मॉल मध्ये एक नवीन स्टोर सुरु करून आपली सर्वोत्तम कारीगरी बोरिवली मध्ये देखील उपलब्ध करवून दिली आहे. १७०० चौरस फुटांच्या या स्टोरमध्ये दागिने प्रेमींना खरेदीचा एक शानदार आणि मनमोहक अनुभव प्रदान केला जात आहे. बोरिवली स्टोरमध्ये रिफाईंड ग्रे पॅलेट आणि फ्ल्युटेड पॅनल व प्लास्टर टेक्श्चर यासारख्या प्रीमियम सामग्रीचा वापर केला गेला आहे, ज्यामुळे दागिन्यांची चमक ठळकपणे दिसून येते. कन्सिल्ड स्टोरेज, व्हीआयपी एरिया आणि चार सिमेट्रिकल डिस्प्ले झोन यांच्यासह हे स्टोर झेन डिझाईनची उत्कृष्टता आणि सर्वोत्तम खरेदी यांचा पुरेपूर अनुभव प्रदान करेल. झेन ब्रँड उच्च दर्जाच्या नैसर्गिक हिऱ्यांचे दागिने करण्याच्या नैपुण्यासाठी सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या दागिन्यांमध्ये कालातीत शान आणि आधुनिक डिझाईनचा सहज मिलाप दिसून येतो. सर्वोत्कृष्ट कारीगरी आणि नावीन्य घडवत राहण्याचा समृद्ध वारसा पुढे नेत हा ब्रँड चोखंदळ, पारखी ग्राहकांच्या गरजा पूर्ण करतो. एक्सक्लुसिव्ह, सर्वोत्कृष्ट, सोफिस्टिकेशन ही सर्व गुणवैशिष्ट्ये असणारे दागिने ज्यांना हवे असतात अशा ग्राहकांना इथे पुरेपूर समाधान लाभते. नील सोनावाला, मॅनेजिंग डायरेक्टर, झेन डायमंड यांनी सांगितले,"भारत ही नेहमीच आमच्यासाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे. वांद्र्यामध्ये आमच्या पहिल्या स्टोरला मिळत असलेल्या यशाने आमचा उत्साह वाढवला आहे. बोरिवलीमध्ये आम्ही नवीन स्टोर सुरु करून मुंबईतील अजून अनेक ग्राहकांना झेन डायमंडची सर्वोत्कृष्ट कारीगरी प्रस्तुत करून आम्ही खूप खुश आहोत. आमच्या कलेक्शनमध्ये परंपरा आणि आधुनिक डिझाईन यांचा सुंदर मिलाप आहे, आधुनिक दागिने पारखी ग्राहकांसाठी ही कलेक्शन्स उत्तम आहेत." समीप पाठक, सीईओ, स्काय सिटी मॉल म्हणाले,"आमच्या रिटेल परिवारामध्ये झेन डायमंडचे स्वागत करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. स्काय सिटी मॉलमध्ये खरेदीचा सर्वोत्तम आनंद प्रदान करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. झेन डायमंडसारख्या जगप्रसिद्ध ब्रँडचे स्टोर आल्याने आमच्याकडील ब्रँड मिक्स अधिक समृद्ध झाले आहे. आम्ही ग्राहकांना त्यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट दागिने खरेदी करताना पाहण्यासाठी उत्सुक आहोत." उत्तमोत्तम दागिन्यांव्यतिरिक्त हा ब्रँड परफ्युम, टाय, घड्याळे, पेन, सोन्याची नाणी यांच्यासहित लक्झरी ॲक्सेसरीजची क्यूरेटेड श्रेणी देखील प्रस्तुत करतो. उंची आणि दर्जेदार गिफ्टिंग असो किंवा स्वतःसाठी खास खरेदी करायची असो, हे स्टोर वन-स्टॉप-डेस्टिनेशन आहे.




## उमटे धरण कोरडं, पण रेवदंडा हायस्कुलजवळ आठ महिने नळ फुटलेला ; लाखो लिटर पाणी वाया!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रेवदंडा ग्रामपंचायतीचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर; ग्रामस्थ म्हणतात, "२० रुपयाचं काम आठ महिने प्रलंबित!"एकीकडे उमटे धरणात पाण्याचा थेंब थेंबासाठी ग्रामस्थांचे हाल सुरु आहेत, ३-४ दिवसांनी एकदाच पिण्याचे पाणी मिळते. पण दुसरीकडे, रेवदंडा हायस्कुलच्या गल्लीत गेल्या आठ महिन्यांपासून नळ फुटलेला असून त्यातून धारेप्रमाणे पाणी वाहत आहे. लाखो लिटर पाण्याची नासाडी होत असतानाही ग्रामपंचायतीने कानाडोळा केला आहे. या भागातून दररोज पर्यटक, स्थानिक ग्रामस्थ, बैलगाडीचे सराव करणारे नागरिक ये-जा करतात. पाण्याच्या साचलेल्या प्रवाहामुळे रस्ता चिखलयुक्त आणि घसरडा झाला आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीचे सदस्य आणि कर्मचारीही याच मार्गाने मच्छी खरेदीसाठी जातात, पण फुटलेला नळ त्यांच्या लक्षात येत नसल्याचं ढोंग करत आहेत. ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रार करूनही नळ दुरुस्त करण्यासाठी केवळ २० रुपयांची साधी कारवाई देखील करण्यात आलेली नाही. "गावात प्यायला पाणी नाही आणि इथे आठ महिने पाणी वाया! एवढंही काम ग्रामपंचायत करू शकत नसेल, तर त्यांना जबाबदार कोण धरणार?" असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.हा नळ एक दिवस बंद झाला, तरीही हजारो लिटर पाणी वाचू शकतं. पाण्याच्या टंचाईमुळे त्रस्त असलेल्या ग्रामस्थांची ही असंवेदनशीलतेमुळे फसवणूकच होत आहे. आता तरी ग्रामपंचायतीने जाग यावी, हीच ग्रामस्थांची अपेक्षा आहे.



# १६ वर्षानंतर सुदर्शन विद्यालय सांगवी पाटणचे माजी विद्यार्थी एकत्र येत स्नेहमेळावा संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील २००९ सालचे दहावी वर्गातील माजी विद्यार्थी एकत्र येत व आपल्या वेळेतील शिक्षकांनाही कार्यक्रमासाठी बोलवत १६ वर्षानंतर एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यामुळे १६ वर्षानंतर पुन्हा एकदा शाळेमध्ये दहावीचा वर्ग भरला होता. कार्यक्रम प्रसंगी प्रथम प्रमुख पाहुणे व शिक्षकवृंद , विद्यार्थी यांच्या उपस्थित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली. व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विशेष म्हणजे त्यावेळचे वर्गशिक्षक सूर्यवंशी सर यांनी वर्गात हजेरी घेतली यावेळी मुलं व मुली मिळून ३५ विद्यार्थी उपस्थित होते.



सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद पाहावयास मिळत होता. आष्टी तालुक्यातील सुदर्शन विद्यालय सांगवी पाटण येथील २००९ सालच्या दहावीच्या बॅचचे सर्व माजी विद्यार्थी सोमवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी १०ते दुपारी २ वाजे पर्यंत एकत्र येत स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. स्नेह मेळाव्यासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक दिंडे सर हे होते तर या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती प्रसिध्द उद्योजक पांडुरंग सोनवणे, मा. सभापती शत्रुघ्न मरकड , सरपंच दत्तात्रय खोटे तसेच शिक्षकवृंद मुख्याध्यापक बोडखे सर,सूर्यवंशी सर,गवारे सर, तोरडमल सर,ढोले सर, बोडखे सर, शेलार सर, हाके सर, बांगर सर, झगडे सर, मरकड सर, जाधव सर, शिपाई बाबुराव खिलारे हे शिक्षकवृंद उपस्थित होते. हा स्नेह मेळावा सकाळी दहा ते दोन वाजेपर्यंत विविध कार्यक्रमाची मेजवानी देत आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांना नाश्त्याची सोय करण्यात आली होती. विद्यार्थ्यांकडून जुनी आठवण म्हणून सुदर्शन विद्यालय या शाळेला भेटवस्तू देण्यात आली. या स्नेह मेळाव्यासाठी २००९ सालचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले .यावेळी माजी विद्यार्थी, प्रमुख पाहुणे व शिक्षकांनी आपले मनोगत, कविता व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक विद्यार्थी हे शासकीय सेवेत वेगवेगळ्या व्यवसायामध्ये, समाजकारण, राजकारणामध्ये, यशस्वी झाले असल्याचा आनंद यावेळी शिक्षकांनी व्यक्त केला तर १६ वर्षानंतर जुन्या मित्रांची एकत्र भेट झाल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये आनंद ओसंडून वाहत होता

## महाराष्ट्र पोल्ट्री संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर शेतकरी पोल्ट्री योद्धा पुरस्काराने सन्मानित

### महाराष्ट्रातील पोल्ट्रीधारक शेतकरी आहेत ज्यांच्या सहकार्यानेच मला हा पुरस्कार मिळाला - अनिल खामकर

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधी**
**किरण बांधणकर**

पेणचे भूमिपुत्र तथा महाराष्ट्रराज्य पोल्ट्री असोसिएशनचे अध्यक्ष अनिल खामकर यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई रायगड जिल्हा आयोजित वर्धापनदीन निमित्ताने महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा शेतकरी संघटना या पुरस्काराने गौरविण्यात आले. अनिल खामकर हे नेहमीच पोल्ट्री व्यावसायिक व सामाजिक कार्यासाठी अग्रेसर राहिले आहेत. गोरगरीब लोकांना सहकार्य करण्यासाठी ते नेहमी पुढाकार घेतात. कोरोना काळातील त्यांचे योगदान वखाणण्याजोगे आहे. कोरोना काळात पोल्ट्री व्यावसायिक शेतकरी संकटात असताना व चिकन खाण्याची नागरिकांमधील भीती दूर करण्यासाठी त्यांनी पेण येथे मोफत चिकन फेस्टिवलचे आयोजन केले होते. येईल त्या नागरिकांना मोफत चिकन फ्राय व बिर्याणीचा आस्वाद देऊन चिकन विक्रीसाठी व चिकन खाणाऱ्या लोकांमध्ये जनजागृती करण्याचे योग्यवेळी योग्य काम केले व त्याचा परिणाम म्हणून दुसऱ्याच दिवसापासून चिकन विक्रीत वाढ होऊ लागली.
यामुळे अनेक पोल्ट्री व्यावसायिक शेतकरी आर्थिक संकटातून बाहेर निघाले. अनिल खामकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील तळागाळातील पोल्ट्री व्यावसायिक शेतकरी एकत्र करून शेतकऱ्यांची तालुका, जिल्हा तसेच संपूर्ण महाराष्ट्राची शेतकरी पोल्ट्री योद्धा कुक्कुटपालन संघटना उभारली व सर्वानुमते त्यांची या संघटनेच्या महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून निवड झाली. यानंतर त्यांनी पोल्ट्री व्यवसायात येणाऱ्या अनेक त्रुटी दूर करून त्याची शासनास भाग पाडले. यामुळे दरमाही उत्पन्नात वाढ होऊ लागली. पोल्ट्रीसाठी आकारण्यात येणारा ग्रामपंचायत कर कमी केला. यामुळे त्यांना दिलेला पुरस्कार हा अगदी योग्य आहे असे मत पेण तालुका शेतकरी पोल्ट्री योद्धा अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे व मॅनेजिंग डायरेक्टर विलास साळवी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते
तसेच या पुरस्काराचे खरे हक्कदार माझे सर्व महाराष्ट्रातील पोल्ट्रीधारक शेतकरी आहेत ज्यांच्या सहकार्यानेच मला हा पुरस्कार मिळाला असे मत अनिल खामकर यांनी पत्रकार प्रतिनिधिशी बोलताना व्यक्त केले.



## हजरत आली शहा दर्गा उमरी येथे चादर पांघरणे कार्यक्रमात खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार रविंद्र वसंतराव पाटील चव्हाण साहेब यांच्यासाठी बोललेला नवस आज उमरी येथील हजरत शहा अली दर्गा येथे चादर पांघरून पूर्ण करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कैलाश भाऊ गोरठेकर, सुभाष पाटील किन्हाळकर, गोविंद पाटील गौड, हनमंतराव पाटील चव्हाण, माधवराव पाटील शिंगणापूरकर, मोहनराव पाटील कार्लेकर, प्रकाश पाटील चिंचाळकर, राजू पाटील बोळसेकर, आनंदराव पाटील महाटीकर, मारोतराव पाटील भुजबळे, माधवराव पाटील बोळसेकर, व्यंकटराव केसगिरे, उत्तम मामा चव्हाण, बाबुराव पाटील कुदळेकर, शंकरराव पाटील जामगावकर, भुजंग पाटील शिंदे,बालाजी ढगे,छावा हनुमंत पाटील बेंद्रे, विजय पाटील भायगावकर, राजेश पाटील ढगे, गजानन अडगुलवार, बालाजी सूर्यवंशी, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व हजरत अली शहा दर्गा उमरी या कमिटीतील सर्व सदस्य उपस्थित होते.



## शिव शक्ती युवा बहुउद्देशिय संस्था धानोरा तर्फे डॉ.विजय पर्बत (अध्यक्ष)श्री संत भोजाजी महाराज संस्थान आजनसरा यांचे मानले आभार



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** श्री संत भोजाजी महाराज संस्थान हे विदर्भातील पंढरी म्हणुन ओळखल्या जाते.परंतु या तीर्थक्षेत्राला पश्चिम विदर्भाशी जोडणाऱ्या रोहिणी घाट या मार्गावरून वाहणाऱ्या वर्धा नदीवर पूल नसल्याने भाविक भक्ततांना जवळपास ४० ते ५० किमी चा फेरा घेऊन यावे लागत होते, त्यामुळे संत भोजाजी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष माजी पं.स. सदस्य डॉ. विजय पर्बत, विश्वस्तमंडळ सरपंच श्रावण काचोळे, सामाजिक कार्यकर्ते संजय कोसूरकर यांनी वेळोवेळी केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी, जेष्ठनेते माजी खा. दत्ताजी मेघे, रामदासजी तडस, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आ. भावनाताई गवळी आ. समिर कुणावार, माजी विधान परिषद आ. रामदास आंबटकर यांच्या कडे गेल्या दशकपासून रोहिणीघाट पुलाबाबत शिस्टमंडळासह भेटी घेऊन निवेदने देऊन सतत पाठपुरावा सुरु होता,स्थानिक नेते आ. समिर कुणावार माजी,आ.डॉ. आंबटकर, माजी खा. रामदासजी तडस, यांच्या सततच्या पत्रामुळे ना. गडकरी यांच्या कडे जेष्ठ नेते दत्ताजी मेघे यांनी पूलनिर्मिती बाबत आग्रही भूमिका घेतल्याने ना. गडकरी यांनी केंद्रीय निधीतून ३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन भोजाजी भक्ततांना व वर्धा यवतमाळ जिल्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या परिसरात येणाऱ्या आजनसरासह हिवरा, फुकटा, वडनेर, दारोडा, येरणगाव, सिरसगाव, उंदरी, मनसावळी,कान्होली, जागजई, टाकळी (निधा) धानोरा, वनोजा, परसोडा, अंतरगाव या ग्रामपंचायतीच्या वतीने ठराव घेऊन या मार्गावर पूल निर्मिती बाबत सतत मागणी सुरु होती त्यामुळे केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी यांनी दखल घेऊन, आजनसरा या तीर्थक्षेत्राला पश्चिम विदर्भात येणाऱ्या कळंबचे चिंतामणी, माहूरगडाची रेणुकामाता या तीर्थक्षेत्राला अगदी कमी अंतराने जोडणारा महत्वकांक्षी असलेल्या रोहिणीघाट पुलासाठी केंद्रीय निधीतून ३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. डॉ.पर्बत यांच्या मार्फत शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला आणि त्यांच्या या प्रयत्नांमुळे रोहणी या घाटावर पुलाला मंजुरी मिळाली म्हणुन धानोरा येथील प्रगतिशील युवा शेतकरी आणि संत भोजाजी महाराज यांचे भक्त बादल देवतळे तसेच धानोरा येथील शिव शक्ती युवा बहुउद्देशिय संस्था धानोरा यांचे अध्यक्ष सुहास मुडे, उपाध्यक्ष गजानन सुरकर, सचिव संजय बडवाईक, सदस्य अंकित कामडी, प्रणय मुडे, अंकित पाटील, स्वप्नील भोयर, योगेश घोडे आणि इतर सदस्यांनी त्यांचे आभार मानले.

## दूंदरे ग्रामपंचायत हद्दीत विविध कामाचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील भूमिपूजन व लोकार्पण सोहळा खासदार मावळ लोकसभा श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते करण्यात आले दुंदरे ग्रामपंचायत सरपंच सुभाषशेठ भोपी यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकास कामे होत असून आज सकाळी ११ वा शिवनसई येथे अंगणवाडी बांधकामाचे भूमिपूजन दूंद्रे पाडा येथील अंगणवाडी चे भूमिपूजन सिमेंट बंधारा लोकार्पण हे तीन कामे भूमिपूजन व लोकार्पण खासदार श्रीरंग आप्पा बारणे शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे सरपंच सुभाष भोपी यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी श्रीरंग बारणे म्हणाले पनवेल तालुक्यातील खेड्यापाड्यात पाण्याचा प्रश्न असो अंगणवाडीचा प्रश्न असो ते नियमाने सुटले पाहिजे घंटा गाडी रुग्णवाहिका असो असे अनेक प्रश्न असतील तर सोडवण्याचा प्रयत्न मी करेन असे म्हणाले यावेळी ग्रुप ग्रामपंचायत दूंदरे शितल भोपी सदस्य जयदास चौधरी विश्वास पाटील महेश पाटील सुप्रिया करमेलकर राणी शिंगारे ललिता चौधरी शकुंतला गोसावी प्रलय भोपी कमला वाघमारे ग्रामपंचायत अधिकारी भारत भोपी महादू गायकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# निवासी मुकबधीर विद्यालय,अनसिंग येथे भारतरत्न, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 विं जयंती साजरी.

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म गरीब कुटूंबात झाला. त्यांचे शिक्षण मोठ्या कठीण प्रसंगातून पार पडले. शिका आणि संघटीत व्हा, संघर्ष करा ! असा त्यांनी मूलमंत्र दिला. शिक्षण सतत चालणारी प्रक्रिया आहे. कोणत्याही समाजावर भेदभाव न करता आरक्षण देऊन समाजाचा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सन्मान केला.

आज प्रत्येकाचा जीवनप्रवास हा संघर्षग्रस्त आहे आणि आप-आपल्या समस्येने सर्वच ग्रस्त आहे. हे सर्व आपण स्वतःकडे पाहून जगतो. पण जगाच्या पाठीवर महामानव जन्माला येतात, ते संघर्ष करतात. तो स्वतःसाठी नव्हे तर,



तो संघर्ष असतो अखिल मानवजातीसाठी आणि मानव जातीच्या मुक्तीसाठी असतो, असे मत मंचकावरून प्रमुख पाहुणे म्हणून श्री स्वामी समर्थ विशेष शिक्षक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य अवनिशजी पांडे सर ह्यांनी व्यक्त केले. ते निवासी मुकबधीर विद्यालय, अनसिंग येथे साजऱ्या होणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बोलत होते. ह्यावेळी समयोचित मान्यवरांचे भाषणे झालीत. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रजोलीत करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करण्यात आला. ज्या महामानवाने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. एक आगळी वेगळी ओळख देऊन समाजात मानाचे स्थान दिले. महिलांना सन्मानाचे जीवन देऊन अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेले. या देशाला समता, बंधुता आणि न्यायाची राज्यघटना दिली. असे मत श्री. आर. आर. खवले सर ह्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार गजाननभाऊ पवार, प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक एन. एस. कोल्हे सर, प्राचार्य अवनिशजी पांडे सर होते तर आभार प्रदर्शन बी. डी. बारगड सर ह्यांनी केले. कार्यक्रमाला एन. एस. कोल्हे सर (मुख्याध्यापक),एस. बी. सातव, आर. आर. खवले, बी. डी. बारगड,कु. एस. डी. चांदेकर, प्राचार्य अवनिशजी पांडे सर, व्ही. एस. धबाले,सि. बी. लांडगे, एस. बी. सोनटक्के, जि. एस. खंडागळे, कु. के. बी. डाळ, कु. मनीषा कराळे, मेजर कैलासभाऊ खंदारे, पत्रकार गजाननभाऊ पवार, नरेन्द्र कोवे सर आदी हजर होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी ह्यांनी अथक परिश्रम घेतले.

# रिठद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान संपन्न

**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोड तालुक्यातील रिठद येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान दि.१५ एप्रिल २०२५ रोजी रिठद येथील संत सभागृहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे सुरवातीला राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष व सर्वच मान्यवरांचे हस्ते करण्यात आले व रितसर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार कुळमेथे होते तर प्रमुख अतिथी म्हणून गावच्या सरपंचा सौ.पंचफुला प्रल्हाद अंभोरे, नारायण किसन आरु तालुका प्रमुख शिवसेना, विठ्ठलराव आरु मा.उपसभापती कृ.ऊ.बा.समीती रिसोड, धनंजय बोरकर संचालक, प्रदीप बोरकर पोलीस पाटील, आत्माराम आरु संचालक खरेदी -विक्री रिसोड, राजाराम आरु मा.उपसभापती, गजानन आरु, उपस्थित होते.यावेळी महसूल विभागाच्या वतीने नायब तहसीलदार कुळमेथे यांचे शाल ,पूष्पगुच्छ तसेच सर्वांचे बेलपत्राचे झाड देऊन स्वागत करण्यात आले. यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.यावेळी सुरवातीलाच नारायण आरु यांनी आपल्या भाषणात महसुली मंडळातील सर्वच शेतकऱ्यांना व गावकऱ्यांना आवाहन केले की जलतारा योजनेचा फायदा घेऊन शेतीचा स्तर सुधारावा व उत्पन्न वाढवावे,पी.




एम.व नमो योजनेच्या तक्रारी, श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजना, विधवा, अपंग इत्यादी लोकांच्या तसेच शेतरस्त्याच्या तक्रार निकालात काढण्यासाठी आपणच पूढाकार घ्यावा व प्रतिसाद द्यावा. आणि ७/१२ लाभ आधार जोडणीसाठी अग्रीस्टॅक करण्यासाठी शेतकऱ्यांनी करून घेणं गरजेचे आहे. शासनाच्या योजना याशिवाय मिळणार तसा अध्यादेश प्राप्त झाला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांचे सहकार्य अपेक्षित आहे.शासन आपल्या दारी आले आहे.त्यांच्याकडे तक्रार करा आणि तक्रारीचे निवारण करुण घेण्याचे आवाहन केले.तसेच विठ्ठलराव आरु यांनी तलाठी कृषी सहाय्यक यांच्या उपस्थिती विषयी आपले विचार मांडले तर गावच्या महसुली सीमा कायम कराव्या असे विचार यावेळी मांडले तर गजानन निराधाराचे प्रश्न मार्गी लागावे तलाठी कृषी सहाय्यक यांच्याकडून लोकांची अपेक्षा आहेत त्या पूर्ण कराव्या व उपस्थित स्थानिक दिलेल्या दिवशी उपस्थित राहावे असे विचार मांडले. तर अध्यक्षीय भाषणात नायब तहसीलदार कुळमेथे यांनी श्रावण बाळ योजना संजय गांधी निराधार योजना, विधवा, अपंगांच्या इत्यादी योजनेचा लाभ घेऊन आपल्या काही याबाबत तक्रारी असल्यास त्या पूर्ण करण्यात येतील आणि पी.एम. किसान, नमो योजना, अन्नधान्य पुरवठा योजना, जलतारा, बचत गट, इत्यादी बाबत आणि शेतकऱ्यांच्या रस्त्याबाबत कोणत्याही तक्रारी असल्यास त्याची दखल घेऊन त्या सोडवण्यात येतील तसेच जलतरा या योजनेमध्ये अल्पभूधारकांना चार हजार सहाशे अधिक चे रुपये सहकार्य म्हणून भेटतात त्याचाही फायदा घ्यावा. व आपल्या परिसरातील पाण्याचे पातळी वाढवण्यासाठी या माध्यमातून प्रयत्न करावेत.असे अध्यक्षीय भाषणात नायब तहसीलदार कुळमेथे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन तलाठी गोटे यांनी केले. तर आभार प्रदर्शन बाविस्कर यांनी केले. या कार्यक्रमादरम्यान रस्ता मिळण्यासाठी २तक्रारी, गट नंबर दुरुस्तीसाठी १, पुरवठा विभागाकडे १, संजय गांधी निराधार २फाईल, वारसाच्या २फाईल, लोककलावंताच्या फाईल २, पीएम किसान योजनेअंतर्गत १ व जलतारा योजनेचे २७५ अर्ज आजपर्यंत प्राप्त झाले. या कार्यक्रमाला मंडळ अधिकारी श्री पडवे, रिसोड मंडळ अधिकारी नप्ते , स्थानिक स्तरचेचिार अधिकारी ,आणि रिठद महसुली मंडळातील सर्वच तलाठी, कृषी सहाय्यक,ग्रामपंचायत अधिकारी, रोजगार सेवक, पोलीस पाटील, अन्नधान्य पुरवठा संघटनेचे पदाधिकारी,कोतवाल व मंडळातील सर्व शेतकरी व आपल्या समस्या घेऊन आलेले लोक उपस्थित होते. यावेळी मंडळ अधिकारी पडवे व कोतवाल रवी आरु यांनी या कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न केले त्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी झाला व नियोजनबध्द संपन्न झाला.

## घाटंजी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राजू घोडके यांच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल

### पियुष उन्नरकर यांनी ठोठावले न्यायालयाचे दार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

घाटंजी दि(१५):-नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राजू घोडके हे रुजू झाल्यापासून विविध वादग्रस्त आणि बेकायदेशीर कृत्यांमुळे चर्चेत राहिले आहेत. दरम्यान मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात पियुष उन्नरकर घाटंजी येथील रहिवाशाने त्यांच्यावर गंभीर आरोप करत थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, या याचिकेचा क्रमांक ८५३३/२५ असा आहे. पियुष उन्नरकर यांनी खाजगी सावकाराकडून वैयक्तिक गरजांसाठी व्याजाने रक्कम घेतली होती. या व्यवहारासाठी त्यांनी आपल्या राहत्या घराचा इसार चिठ्ठीद्वारे इसार करून दिला होता. मात्र, या इसार चिठ्ठीचा गैरवापर करत मुख्याधिकारी राजू घोडके यांनी सावकार व माजी नगरसेवक गजानन भालेकर यांच्याशी संगनमत करून सदर मालमत्ता क्रमांक १४०००८ ही बेकायदेशीर पद्धतीने सावकाराच्या नावे नगर परिषदेकडून हस्तांतरण करून दिली. विशेष म्हणजे, सदर मालमत्ता प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत असल्यामुळे शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार अशा प्रकारच्या मालमत्तांचे हस्तांतरण किमान १० वर्षांपर्यंत करता येत नाही, तसेच खरेदी विक्री चा व्यवहार होऊ शकत नाही. या प्रकरणाचा उलगडा उन्नरकर यांनी नगरपरिषदेकडील कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर झाला. पियुष उन्नरकर यांनी दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी घाटंजी पोलीस ठाण्यात या प्रकरणी राजू घोडके, संबंधित लिपिक व इतरांच्या विरोधात तक्रार दाखल केली. ही तक्रार दाखल होताच, दबावात येऊन किंवा संभाव्य पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मुख्याधिका-यांनी त्याच दिवशी मालमत्तेचा फेरफार करून पुन्हा मूळ मालक उन्नरकर यांच्या नावावर मालमत्ता नोंदवली.

जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष
सदर प्रकरणात न्याय मिळावा याकरीता उन्नरकर यांनी यवतमाळ जिल्हाधिकारी तसेच राज्य शासनाच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे लेखी तक्रार करुन राजू घोडके यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे हताश झालेल्या उन्नरकर यांनी थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयात दाखल याचिकेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे प्रशासनातील अधिकारी पैशाकरीता कसे चुकीचे निर्णय घेतात हे चव्हाट्यावर आले असून याचिकेवर लवकरच सुनावणी होणार आहे.